सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर रविवार, दि. २२ जून २०२५ वर्ष - तिसरे अंक ८० पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# रेडिओ अंतिम व्यक्तिपर्यंत पोहचण्याचे सशक्त माध्यम - मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई, २१ जून : महाराष्ट्र रेडिओ महोत्सव व आशा रेडिओ पुरस्कार सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विविध रेडिओ वाहिन्यांच्या सहा रेडिओ जॉकींनी प्रकट मुलाखत घेतली. या मुलाखतीद्वारे मुख्यमंत्र्यांनी आपल्या रेडिओवरील संगीत ऐकणे, गाने लिहीणे आदी छंदाविषयी मनमोकळा संवाद साधला. आपल्या आयुष्यातील रेडिओविषयक प्रसंगांचे वर्णन त्यांनी संवादाद्वारे केले. यावेळी



मुख्यमंत्र्यांनी शिघ्र कविता करीत गाणेही गायले. रेडिओचे महत्व पूर्वापासुन असून आजही ते अबाधीत असल्याचे सांगत रेडिओ अंतिम व्यक्तिपर्यंत पोहचण्याचे सशक्त माध्यम आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रेडिओचे महत्व अधोरेखीत केले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, आमच्या लहानपणी दिवसाची सुरूवात सकाळी रेडिओ ऐकण्यापासून व्हायची. विविध भारती रेडिओ वाहिनीवर सकाळी येणारी गाणी अगदी न चूकता ऐकली जायची. त्यामुळे रेडिओशी लहानपणापासूनच जुळता आले. शासन दरबारी रेडिओ क्षेत्रात कार्यरत असलेल्या लोकांसाठी काही तरी केले पाहिजे, हा विचार सातत्याने होता. या पुरस्कार सोहळा आयोजनातून त्याचे समाधान लाभत आहे. रेडिओवर कार्यक्रम सुरू असताना माणूस दिसत नाही, पण सचित्र दर्शन शब्दांमधून घडत असते, असे विचार मुख्यमंत्री यांनी व्यक्त केले. जागतिक संगीत दिनाचे औचित्य साधून आयोजित महाराष्ट्र रेडिओ महोत्सव व आशा रेडिओ पुरस्कार सोहळ्यात रेडिओ जॉकी सिद्धू, अक्की, अर्चना, ब्रजेश, भूषण, सपना भट यांनी मुख्यमंत्र्यांची मुलाखत घेतली.

## भारताने इराणच्या बाजूने बोलावे- सोनिया गांधी

नवी दिल्ली, २१ जून : इराण आणि इस्त्रायल संघर्षात भारताने तटस्थ भूमिका स्वीकारली आहे. यावरून काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांनी जोरदार आगपाखड केलीय. यासंदर्भात सोनियांनी इंग्रजी वर्तमानपत्रात लेख लिहून इस्त्रायलचा निषेध करायला हवा अशी मागणी देखील केली आहे.

सोनिया गांधी म्हणाल्या की, इराण भारताचा जुना मित्र असून अशा परिस्थितीत भारताचे मौन अस्वस्थ करणारे आहे. भारताने गाझामधील विध्वंस आणि इराणमधील हल्ल्यांबद्दल स्पष्ट, जबाबदार आणि जोरदार आवाजात बोलले पाहिजे. अजून उशीर झालेला नाही, अशा शब्दांमध्ये सोनिया गांधी यांनी इस्त्रायलने इराणवर केल्या हल्ल्याचा निषेध केला. आपल्या लेखात त्या म्हणाल्या की, इस्त्रायल हा देश स्वत: एक अण्वस्त्रधारी आहे, परंतु अण्वस्त्रे नसतानाही इराणला लक्ष्य केले जात आहे. हा इस्त्रायलचा दुटप्पीपणा आहे. गेल्या १३ जून रोजी इस्त्रायलने इराणच्या सार्वभौमत्वाचे उल्लंघन केले आणि एकतर्फी हल्ला केला, जो बेकायदेशीर आणि प्रादेशिक शांततेसाठी धोकादायक आहे. काँग्रेस इराणमधील या हल्ल्यांचा निषेध करते. गाझावरील हल्ल्याप्रमाणेच इस्त्रायलची ही कारवाई देखील क्रूर आणि एकतर्फी आहे. हा हल्ल्यामुळे प्रादेशिक आणि जागतिक स्तरावर गंभीर अस्थिरता आणि संघर्ष होऊ शकतो, असा इशाराही त्यांनी दिला आहे. इराण आणि अमेरिका यांच्यात चर्चा सुरू असताना आणि त्याचे चांगले संकेत मिळत होते. या वर्षी ५ च फेऱ्या चर्चेच्या झाल्या आहेत आणि सहाव्या फेरीच्या चर्चेचे आयोजन जूनमध्ये होणार होते. मार्चमध्येच अमेरिकेच्या राष्ट्रीय गुप्तचर संचालक तुलसी गॅबार्ड यांनी संसदेत सांगितले होते की, इराण अण्वस्त्रे बनवण्यावर काम करत नाही. तरीही इस्त्रायलने इराणवर हल्ला केला. इस्त्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या नेतृत्वाखाली, इस्त्रायलने सतत शांतता बिघडवण्याचे आणि दहशतवादाला प्रोत्साहन देण्याचे काम केले आहे. हे खूप दुर्दैवी आहे, अशी खंतही सोनिया गांधी यांनी आपल्या लेखातून व्यक्त केली आहे.

## पुण्यातील नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा; कोकण किनारपट्टीला उंच लाटांचा इशारा

मुंबई, २१ जून : पुणे विभागात झालेल्या पावसामुळे नद्यांमध्ये विसर्ग सुरू करण्यात आला असून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तर कोकण किनारपट्टीला भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्र (आय.एन.सी.ओ. आय.एस.) तर्फे उंच लाटांचा इशारा देण्यात आला आहे. लहान होड्यांना समुद्रात न जाण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने कळविले आहे.

राज्य आपत्कालीन केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणात पाण्याची आवक ६३ हजार ६४५ क्युसेक इतकी होत असुन सद्यस्थितीत धरणात ७२.७९ टक्के इतका पाणी साठा आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील जगबुडी नदी इशारा पातळीवर असून अतिवृष्टीमुळे दापोली, खेड, चिपळूण आणि संगमेश्वर या तालुक्यांमध्ये झाड कोसळून आणि भिंत पडून खाजगी मालमत्तांचे नुकसान झाले आहे. तसेच पुराच्या पाण्यात जनावरे वाहून गेल्याची नोंद झाली आहे. राष्ट्रीय महामार्ग १७३ किमी ३०/६०० चिपळूण तालुक्यातील अंजवेल- रानवेल- पलटणे-श्रृंगरतली- कोटलूक- आबोली- भडगाव चारवेली रास्ता खचला असून या मार्गावरून एकेरी वाहतूक सुरू असल्याचे राज्य आपत्कालीन केंद्राने कळविले आहे. राज्यात मागील २४ तासांमध्ये (२१ जून २०२५ रोजी सकाळपर्यंत) रत्नागिरी जिल्ह्यात ३४ मिमी पाऊस झाला आहे. तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात २७.९ मिमी, कोल्हापूर २३.७ मिमी, रायगड जिल्ह्यात १२.४ मिमी आणि पालघर जिल्ह्यात ११.४ मिमी सर्वाधिक पावसाची नोंद झाली आहे.

राज्यात कालपासून आज २१ जून रोजी सकाळपर्यंत झालेल्या पावसाची सरासरी आकडेवारी पुढीलप्रमाणे (सर्व आकडे मिलिमीटरमध्ये) : अहिल्यानगर ०.२, पुणे ४.२, सोलापूर ०.४, सातारा १०.६, सांगली ६.१, कोल्हापूर २३.७, छत्रपती संभाजीनगर ०.९, जालना ०.४, लातूर ०.५, धाराशिव ३.२, नांदेड ०.१, परभणी ०.३, हिंगोली २.५ जिल्ह्यात १.८ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

## १४ वर्षीय बालकाचा खून

जळगाव, २१ जून-एरंडोल तालुक्यातील रिंगणगाव येथे १६ जून रोजी १४ वर्षीय तेजस गजानन महाजन या बालकाचा खून करण्यत आला होता. घटनाने सर्वत्र भीतीचे सावट पसरले होते. विशेष म्हणजे हा नरबळीचा प्रकार असल्याचा आरोप नातेवाईक आणि गावकऱ्यांनी केला होता. ग्रामस्थांनी रास्ता रोको करत तातडीने तपास करण्याची मागणी देखील केली होती. त्यानंतर पोलीसांनी तपासाची गती वाढवली आणि आता 'समोरून येताना धक्का लागल्याचा राग आल्यामुळे आरोपींनी तेजसचा मारहाण करून आणि अखेरीस गळा चिरून खून केल्याचे' कबूल केले आहे. संशयित आरोपींनी मद्यपान केल्यामुळे आधीच ते ठिकाणावर नव्हते. अशाच समोरून येणाऱ्या तेजसता त्यांना धक्का लागल्याने आरोपी आणि मयत तेजस मध्ये शाब्दिक वाद वाढला. वादाचे रूपांतर प्रचंड शिवीगाळात झाले. या रागाच्या भरातच आरोपींनी नशेत तेजसच्या खून केला.

## अशांत जगाला योगातून शांतता मिळू शकेल : पंतप्रधान

विशाखापट्टनम, २१ जून : वर्तमानात जगाला तणाव, अशांतता आणि अस्थिरतेने ग्रासले आहे. या अशांततेच्या वातावरणात जगाला योगातून शांततेची दिशा मिळू शकेल असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. अकराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आज, शनिवारी आंध्रप्रदेशच्या विशाखापट्टनम येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमात मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू आणि उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनीही सहभाग नोंदवला.

यावेळी पंतप्रधान म्हणाले की, अशांतता आणि तणावाच्या वातावरणात जगाची वाटचाल सुरू आहे. अनेक देशांमध्ये अस्थिरता वाढीस लागली आहे. अशा परिस्थितीत योग शांततेचा मार्ग दाखवू शकतो. योग मानवाला श्वास घेण्यासाठी, संतुलन राखण्यासाठी आणि पुन्हा नव्या दमाने पुढे जाण्यासाठी क्षणभर विश्रांती प्राप्त करून देतो. योगचा साधा अर्थ होतो जोडले जाणे. योगाने संपूर्ण विश्वाला एका सूत्रात जोडल्याचे चित्र असून ते फार सुखावह



आहे. संयुक्त राष्ट्रात जेव्हा भारताने २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जावा, असा प्रस्ताव मांडला तेव्हा कमीत कमी वेळात १७५ देशांनी या प्रस्तावाला पाठिंबा दर्शविला. या प्रस्तावासाठी झालेली एकजूट ही काही सामान्य घटना नव्हती. हा फक्त एका प्रस्तावाला समर्थन देण्याचा विषय नव्हता, तर मानवतेसाठी केलेला हा एक सामूहिक प्रयत्न होता, असे पंतप्रधानांनी सांगितले.

आजघडीला दिव्यांग बांधव ब्रेल लिपीत योगशास्त्राचे अध्ययन करतात, शास्त्रज्ञ अंतराळात योगाचे सराव करतात, तरुण मित्र गावागावांत योग ऑलिंपियाडमध्ये सहभागी होतात. नौदलाच्या सर्व जहाजांवर अप्रतिम योग सत्रांचे आयोजन झाले आहे. ओपेरा हाऊसच्या पायऱ्यांपासून ते एव्हरेस्टच्या शिखरापर्यंत आणि विशाल समुद्रापर्यंत एकच संदेश आहे की, योग सर्वांसाठी आहे. सर्व सीमा आणि क्षमतेच्या पलीकडे योग आहे, अशा शब्दांमध्ये मोदींनी योगाचे महत्व विशद केले. यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची संकल्पना 'एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग' अशी आहे. याबद्दल पंतप्रधान म्हणाले की, या वर्षीची थीम एक मौल्यवान सत्य सांगते. पृथ्वीवरील प्रत्येक घटकाचे आरोग्य परस्परांशी निगडित आहे. माणसांचे आरोग्य त्या मातीवर अवलंबून आहे जिथे अन्न तयार होते, त्या नद्यांवर जे आपल्याला पाणी पुरवतात, त्या प्राण्यांवर जे आपल्यासोबत परिसंस्थेत राहतात आणि त्या वनस्पतींवर ज्या आपल्याला पोषण देतात. योग आपल्याला या परस्परसंबंधांची जाणीव करून देतो, आपल्याला जगाशी एकरूप होण्याचा मार्ग दाखवतो आणि शिकवतो की आपण स्वतंत्र व्यक्ती नाही, तर निसर्गाचा भाग आहोत असे मोदी म्हणाले.

## बर्दापूर महामार्गाचे होणार चौपदरीकरण!

### वार्षिक आराखड्यात समावेश; केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी केली वचनपूर्ती

तभा वृत्तसेवा

अंबाजोगाई शहरा जवळून जाणारा ५४८ बी हा महामार्गावरील बर्दापूर ते लोखंडी सावरगाव या टप्प्याचे चौपदरीकरण करण्याचे आ. नमिता मुंदडा यांच्या प्रचारसभेत दिलेले वचन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी पूर्ण केले आहे. केंद्र सरकारच्या वार्षिक आराखड्यात या मार्गाच्या चौपदरीकरणाचा समावेश करण्यात आला आहे.

अंबाजोगाई आणि लातूरला जोडणाऱ्या ५४८ बी या महामार्गावर बर्दापूरच्या पुढे येताच चार पदरी रस्त्याचे अचानक दोन पदरीत रूपांतर होते. या ठिकाणी येणाऱ्या वाहनांच्या गतीचा अचानक अडथळा होत असल्यामुळे याठिकाणी वारंवार गंभीर अपघात घडत आले आहेत. अनेक निष्पाप नागरिकांचे जीव या अपुऱ्या आणि असुरक्षित रस्त्यामुळे गेले आहेत. त्यामुळे या मार्गाचे चौपदरीकरण करण्याची मागणी गेल्या काही वर्षांपासून सातत्याने केली जात होती.

माजी खासदार प्रीतमताई मुंडे आणि अंबाजोगाईच्या आमदार नमिता मुंदडा यांनी ही नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेऊन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे वारंवार मागणी केली. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभेच्या निवडणुकीदरम्यान अंबाजोगाई येथे झालेल्या आ. नमिता मुंदडा प्रचारसभेत गडकरी यांनी या प्रकल्पासाठी सहा महिन्यांत



**लोखंडी सावरगाव ते मांजरसुंबा रस्ता चौपदरीकरणाचा प्रस्ताव तयार करण्याचेही आदेश**

निर्णय घेण्याचे जाहीर आश्वासन दिले होते.

त्यानंतरही आमदार नमिता मुंदडा यांनी विधीमंडळ त्यानंतरही आमदार नमिता मुंदडा यांनी विधीमंडळ अधिवेशनाच्या काळात गडकरी यांची भेट घेऊन पुन्हा एकदा हा मुद्दा सविस्तर मांडला. या सातत्यपूर्ण प्रयत्नांना अखेर यश आले असून रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांनी २०२५-२६ च्या वार्षिक आराखड्यात लोखंडी सावरगाव ते बर्दापूर या महामार्गाच्या १८ किमी लांबीच्या टप्प्याच्या चौपदरीकरणाचा समावेश अधिकृतरीत्या केला आहे. या

**मांजरसुंबापर्यंत चौपदरीकरणासाठी प्रयत्न : आ. नमिता मुंदडा**

**सध्या दोन पदरी असलेल्या लोखंडी सावरगाव ते मांजरसुंबा या मार्गाचेही चौपदरीकरण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी सविस्तर प्रस्ताव तयार करण्याचे आदेश मंत्री नितीन गडकरी यांनी दिल्याचे आ. मुंदडा यांनी सांगितले.**

कामासाठी सुमारे २५० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित

असून लवकरच निविदा प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे.

या निर्णयामुळे बर्दापूरच्या पुढे अचानक दोन पदरी होणाऱ्या रस्त्यामुळे निर्माण होणाऱ्या अपघातांची साखळी खंडीत होईल. या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांना आता सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवास अनुभवता येणार आहे. या निर्णयाबद्दल आमदार नमिता मुंदडा यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे विशेष आभार मानले असून हा निर्णय प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, या निर्णयाबद्दल नागरिकांतून आनंद व्यक्त करण्यात येत आहे. रस्त्याचे काम नियोजित वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा आता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## बिबट्याचा हल्ला कालवड ठार; महिन्यात तीसरी घटना

**तभा वृतसेवा**

**माहुर, दि.२१ जून -**

तालुक्यातील मौजे आष्टा गावाला लागून असलेल्या शेतातील गोठ्यात बांधून असलेल्या गाईच्या कालवडीवर बिबट्याने हल्ला करून ठार केल्याची घटना दि.१९ जून रोजी उघडकीस आली. पशुपालक शेतकरी अशोक घागरे यांनी वन विभागाकडे नुकसान भरपाई मिळावी म्हणूनऑनलाईन अर्ज सादर केला असून,गावाला लागून असलेल्या गोठ्यातील पाळीव जनावरावर बिबट्याने हल्ला केल्याची ही ह्याच परीसरातील लिंबायतसह दुसरी घटना आहे.

दिनांक १९ रोजी सकाळी आष्टा येथील शेतकरी अशोक घागरे हे आपल्या शेतात गेले असता त्यांना आपल्या गाईची कालवड ही अर्धेमास खाल्लेल्या मृतावस्थेत दिसून आली.



तसेच या ठिकाणी त्यांना बिबट्याच्या पायाचे ठसे दिसून आल्याने त्यांनी तात्काळ माहूर वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना भ्रमणध्वनीवरुन या घटनेची माहिती दिली असता कर्मचाऱ्यांनी येऊन घटनेचा पंचनामा केला.

माहूर तालुक्यातील ग्रामीण भागात गेल्या दोन महिन्यात बिबट्याने अनेक ठिकाणी हल्ले करून शेतकऱ्यांची व पशुपालकांची अनेक जनावरे ठार मारुन फस्त केलेली आहेत तर अनेक मोकाट कुत्र्यांनाही या बिबट्याने आपले भक्ष्य बनविले आहे.

जून महिन्यात बिबट्याच्या पाळीव जनावरांवर हल्लूयाच्या आतापर्यंत तीन घटना घडल्या आहेत. याआधी ०९ जूनच्या रात्री जुने लिंबायत येथील गावालगतच्या गोठ्यातूनही अनिल चुंगडे यांच्या म्हशीचा छोटा रेडा बिबट्याने हल्ला करून बाजूच्या उसाच्या शेतात उचलून नेऊन फस्त केला होता. तर ०६ जूनच्या रात्री गुंडवळ येथील एका शेतकऱ्याच्या गोठ्यात बांधून असलेल्या गाईच्या वासराला देखील बिबट्याने ठार करून आपले भक्ष्य बनविले होते. या घटनेमुळे आष्टासह परिसरातील गावांमध्ये या खुंखार बिबट्याची प्रचंड दहशत पसरली असून, शेतकरी, ग्रामस्थ व विद्यार्थी व वाहनचालक रात्र तर सोडाच दिवसाढवळ्या या परीसरातून एकट्याने जाण्यायेण्यास धजावत नसल्याचे सांगितले जात आहे. हा हल्लेखोर बिबट्या एखाद्या मानवावर हल्ला करून जीवित्तहानी होण्याची शक्यता देखील नाकारता येत नसल्याने माहूर वनविभागाने या खुंखार हल्लेखोर बिबट्याच्या शेतासह गावगोठ्यांवरील पाळीव जनावरांवरील प्राणघातक हल्ले रोखण्यासाठी वेळीच उचित उपाययोजना करुन त्याचा गावपरीसरानजीकचा वावर रोकावा अशी मागणी शेतकऱ्यांसह ग्रामस्थांमधून करण्यात येत आहे.



# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बसफेऱ्यांचे नवीन नियोजन महामंडळाकडून जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ जून -**
शहरातील गांधी चौक येथील मध्यवर्ती बस स्थानक क्र. १ आणि अंबेजोगाई रोडवरील जुना रेणापूर नाका येथील बसस्थानक क्र. २ येथून सुटणाऱ्या बसफेऱ्यांचे नवीन नियोजन जाहीर करण्यात आले आहे. २३ जून, २०२५ पासून या नियोजनानुसार बसेस सुटतील, असे राज्य परिवहन विभागाचे विभाग नियंत्रक यांनी कळविले आहे.

मध्यवर्ती बसस्थानक क्र. ०१ येथून सुटणाऱ्या बसेस- १) लातूर - नांदेड, नागपूर, अमरावती, अकोला मार्गावरील सर्व ग्रामीण, शटल, लांब पल्ला व मध्यम लांब पल्ला बसेस. २) लातूर-तुळजापुर- सोलापूर-पंढरपूर-कोल्हापूर मार्गावरील सर्व बसेस. ३) लातूर-धाराशिव मार्गावरील सर्व शटल बसेस व पुढे तुळजापुर, सोलापुर मार्गावर जाणा-या बसेस. ४) लातूर-आष्टा-उदगीर मार्गावरील सर्व ग्रामीण, शटल, लांब पल्ला व मध्यम लांब पल्ला बसेस. ५) लातूर-जळकोट, मुखेड, बिलोली, निजामाबाद मार्गावरील सर्व ग्रामीण, शटल, लांब पल्ला व मध्यम लांब पल्ला बसेस. ६) पुणे मार्गावरुन येऊन पुढे नांदेड, उदगीर, मुखेड या मार्गावर धावणाऱ्या सर्व बसेस मध्यवर्ती बसस्थानक क्रमांक ०१ येथे प्रवाशी चढ उतार करून पुढे नांदेड, उदगीर मार्गावर धावतील. ७) लातुर-औसा, लातुर-उमरगा, लातुर-निलंगा व पुढे बिदर, हैदाबाद जाणा-या सर्व बसेस. ८) औसा व निलंगा आगाराच्या पुर्ववत चालु असलेल्या सर्व ग्रामीण व रात्रवस्ती बसेस.

मध्यवर्ती बसस्थानक येथील ग्रामीण बसस्थानकावरुन सुटणा-या बसेस. बसस्थानक क्र. ०२ जुना रेणापूर नाका अंबेजोगाई रोड लातूर येथून सुटणाऱ्या बसेस- लातुर-अंबेजोगाई बीड मार्गावरुन पुढे धावणाऱ्या सर्व बसेस धावतील.



### संक्षिप्त वृत्त...

## शॉक लागून म्हैस, वगार दगावली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ जून -**
अहमदपूर तालुक्यातील सोरा येथील एका शेतकऱ्याच्या शेतात (बरड माळावर) विद्युत खांब वाऱ्याने पडून विद्युत प्रवाह चालू असलेल्या तारेचा शॉक लागल्याने एक म्हैस आणि वगार दगावल्याची घटना घडली आहे.

अहमदपूर तालुक्यातील सोरा येथील शेतकरी राम नामदेव घोणशेटे हे आपली म्हैस व वगार घेऊन चारत होते. त्या ठिकाणी विद्युत खांब आठ दिवसांपूर्वी वाऱ्याने पडला होता. खांबावरील विद्युत प्रवाह बंद केला नसल्याने म्हैस व वगारीस विद्युत शॉक बसून जागेवर दगावल्या. यात सव्वालाख रुपये किमतीचे पशुधन दगावले आहे.

## उसणे पैसे वसुलीसाठी तरुणीवर अत्याचार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ जून -**
एका तरुणीला उसने दिलेले पैसे ती देत नसल्याने ते वसूल करण्यासाठी एका तरुणाने चलबुर्गा पाटी, हरंगुळ शिवारातील एक लॉज व पिंपरी चिंचवड येथील लॉजवर नेऊन अश्लील फोटो काढून तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी त्या तरुणाविरुध्द एमआयडीसी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लातूरच्या साई रोड परिसरात राहणाऱ्या एका तरुणाने रेणापूर तालुक्यातील एका तरुणीस पैसे दिले होते. ते परत न मिळाल्याने त्या तरुणाने तरुणीस औसा तालुक्यातील चलबुर्गा पाटी येथील एका लॉजवर नेऊन अनैतिक संबंध ठेवून फोटो काढले. ते फोटो तुझ्या वडिलांना दाखवतो, अशी भीती दाखवत पुन्हा तिला लातूर शहरातील एमआयडीसी परिसरातील हरंगुळ रोडवर असलेल्या लॉजवर तसेच पिंपरी चिंचवड येथील लॉजवर वारंवार नेऊन तिच्यावर अत्याचार केला. हा अत्याचार सहन होत नसल्याने अखेर तरुणीने पोलीस ठाणे गाठले. या प्रकरणी सदर तरुणीच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलिसांत तरुणाविरुध्द गुन्हा नोंद आहे.

## शहरातील सुर्दशन विद्यालयात योग शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ जून -**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अकरा वर्षपूर्ती निमित्त' संकल्प से सिद्धी 'या उपक्रमांतर्गत भाजपाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मंडळात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्ताने योग शिबिराचे आयोजन सुदर्शन विद्यालय, श्रीनगर येथे करण्यात आले होते.



याप्रसंगी संस्थेच्या सचिव सौ. वनिताताई काळे यांनी संस्थेच्या वतीने मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी भाजपाच्या शहर जिल्हा उपाध्यक्ष सौ.सीमा करपे, संयोजक सौ. प्रभावती जाणते , काकासाहेब चौगुले यांच्यासह मंडळ पदाधिकारी, शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हाकेतांडा जिल्हा परिषद शाळेत योग दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ जून -**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हाकेतांडा तालुका रेणापूर,जिल्हा लातूर येथे योग दिन साजरा करण्यात आला विद्यार्थ्यांना योगासनाचे विविध प्रकार,मुद्रा,योगासनाचे महत्त्व सांगण्यात आले.

योगासन कसे करावे याचे प्रात्यक्षिक करून घेतले विद्यार्थ्यांनी दररोज योगाभ्यास केल्याने शरीर सुदृढ होते व आपणास कोणतेही आजार होत नाहीत, आपले शरीर निरोगी प्रसन्न राहते. मुळात भारत देशातला हा योग अभ्यास संपूर्ण जगाला कळाल्यामुळे संपूर्ण जगात योगाभ्यास करत आहेत निरोगी राहत आहे,हे विद्यार्थ्यांना व्यवस्थित समजून सांगितले तसेच योगाभ्यास एका दिवसापुरता नसून तो वर्षभर करायचा आहे आणि याची प्रेरणा २१ जून रोजी जागतिक योग दिन म्हणून साजरा करून घेतली जाते.

## पोलिसांचा 'सेफ स्ट्रीट प्रोजेक्ट'

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ जून -**
लातूर शहरात मुख्य रस्त्यांवर होणारे अपघात व गुन्ह्यांमुळे सर्वसामान्य जनतेमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ नये. सर्वसामान्य नागरिकांना सुरक्षित वातावरण प्रदान करण्यासाठी व शहरातील विशेषतः मुख्य मार्गांवर प्रवास करणाऱ्या नागरिकांना कोणताही उपद्रव अथवा असुरक्षितता वाटू नये, शहरातील सर्व रस्ते महिला, पुरुष, वृध्द यांच्यासाठी सुरक्षित असावेत याबाबत उपाययोजना म्हणून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या संकल्पनेतून लातूर शहरात 'सेफ स्ट्रीट प्रोजेक्ट' राबविण्यात येत आहे.

सदर प्रोजेक्टमध्ये लातूर शहर उपविभागातील सर्व पोलीस ठाणे व वाहतूक नियंत्रण शाखा यांना त्यांच्या हद्दीतील मुख्य रस्ते हे सेफ स्ट्रीटसाठी दत्तक देण्यात आले आहेत. सदर प्रोजेक्टमध्ये शहरातील शिवाजीनगर, एमआयडीसी, गांधी चौक, विवेकानंद चौक या पोलीस ठाण्यांचा सहभाग असून, या पोलीस ठाण्याला त्यांच्या हद्दीमधील मुख्य रस्ते विभागून देण्यात आले आहेत. 'सेफ स्ट्रीट प्रोजेक्ट'दरम्यान रोडवर दारू पिणाऱ्यांवर तसेच ड्रिंक अँड ड्राइव्ह करणारे वाहन चालक, रोडवर गोंधळ घालणे, चैन स्नॅचिंग, रोड रॉबरी यासारख्या गुन्ह्यांना प्रतिबंध करणे व अशा गुन्हेगारांविरुध्द कडक कारवाई करण्यात येणार आहे. भरधाव वेगाने वाहन चालविणे, ट्रिपल सीट वाहन चालविणे, टगेगिरी करणे, रोडवर वाढदिवस साजरे करणे अशा गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यात येणार आहे. रोडवर गटाने फिरुन आरडाओरडा करणारे तसेच महिला व मुलींच्या छेडछाडीच्या घटनांना प्रतिबंध करणे, सार्वजनिकरित्या शस्त्राचे प्रदर्शन करणाऱ्यांविरुध्द कार्यवाही करण्यात येणार आहे. हा विशेष प्रोजेक्ट जून २०२५ या एका महिन्यासाठी राबविण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या आदेशान्वये अपर



पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे व शहर उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत यांच्या मार्गदर्शनात लातूर शहरातील पोलीस ठाणे स्तरावर १ जून ते आजपर्यंत 'सेफ स्ट्रीट प्रोजेक्ट' अंतर्गत दारूबंदी कायद्यान्वये १३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. महाराष्ट्र पोलीस अधिनियम अंतर्गत ८४ जणांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. मोटार वाहन कायद्यांतर्गत ९४२ केसेस दाखल करण्यात आले आहेत. रहदारीस अडथळा करणाऱ्यांवर २४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मद्यपान करून वाहन चालवल्याप्रकरणी १३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आस्थापना निर्धारित वेळेपेक्षा जास्त वेळ चालू ठेवल्याने ७ दुकानदारांवर खटले दाखल करण्यात आले आहेत. तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर ८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## प्राचार्य साळुंके यांच्या सेवापूर्ती निमित्त ग्रंथ प्रकाशन समारंभ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ जून -**
प्राचार्य बालाजी साळुंके यांच्या सेवापूर्ती सोहळ्या निमित्याने, लसाकम परिवार व समाज बांधवांच्यावतीने, रविवार २२ जून २०२५ रोजी सकाळी ११ वाजता, प्रणवश्री मंगल कार्यालय ५ नंबर चौक बार्शी रोड लातूर येथे, थोर विचारवंत प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार व शिक्षक आमदार श्री विक्रम काळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये, व्याख्यान व ' उजेडाच्या वाटेने ' या गौरव ग्रंथाचे प्रकाशन होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. माधवराव गादेकर असणार आहेत.

या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्रा.रामकिशन समुखराव, उत्तमराव दोरवे, के. के. मुखेडकर, मारोती सुर्यवंशी, अशोक तोगरे, प्रा. सुशीलप्रकाश चिमोरे, शोभा रणक्षेत्रे, सिता पारधे, सुरेश चव्हाण, शिवाजीराव गायकवाड चिखलीकर, श्री के. एम. भडीकर, शिवाजीराव तरुडे, सिताराम पवार, प्रा. मारुती कलवले, पांडुरंग देडे, ज्योती मस्के, अॅड. माणिकराव पवार आदींनी केले आहे.

या कार्यक्रमात साळूंके यांचा सत्कार होणार असून ग्रंथ प्रकाशनही होणार आहे.

## निरोगी जीवनाचा आधार म्हणजे योगाचा अंगीकार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ जून -**
शरीर व मनाचे साहचर्य साधण्याचे काम योगामुळे होते. कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना तंदुरुस्त शरीर व कणखर मनाचे महत्व कळाले निमित्त होते आंतरराष्ट्रीय योग दिनाचे. आज दि. २१ जून २०२५ रोजी कृषि महाविद्यालय, लातूर जिमखाना आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या सहकार्याने प्रातः समयी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन कण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष कृषि महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे, योग प्रशिक्षक म्हणून राकेशजी पाठक तर प्रमुख



अतिथी म्हणून, शहाजी कांबळे, शिवाजी गिरी यांची उपस्थिती होती. या प्रसंगी डॉ. ठोंबरे म्हणाले कि, योग ही जगाला भारताने दिलेली मोठी देणगी आहे.

योगामुळेच भारताचा आज विश्वगुरु म्हणून जगात नाव लौकिक होत आहे. २१ जून या दिवशी प्रकाश जास्त आणि अंधार कमी असतो म्हणून आज योग दिन साजरा करतात. जीवनात आरोग्य सूर्याचा उदय हा योगामुळेच होतो. म्हणून केवळ आजच्या एका दिवशी योग करायचा नाही तर वर्षातील ३६५ दिवस योग करून निरोगी राहण्याचा संकल्प आज सर्वांनी करावा. पुढे ते असेही म्हणाले की, निरोगी जीवनाचा आधार म्हणजे योगाचा अंगीकार असून तन व मन यांचा व्यायाम म्हणजे योग होय.

यावेळी योग प्रशिक्षक राकेशजी पाठक यांनी उपस्थिताना योगाचे महत्व सांगून, प्रात्यक्षिक व योगाचे अनेक प्रकार करून घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.अनिलकुमार कांबळे यांनी तर आभार डॉ.दयानंद मोरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. विजय भामरे, डॉ.अनंत शिंदे, डॉ. राजेश शेळके, डॉ. नितीन तांबोळी, डॉ.प्रभाकर आडसूळ डॉ.ज्ञानेश्वर सुरडकर, डॉ.अजित पुरी, प्रल्हाद जोंधळे आदिंनी परिश्रम घेतले.

## 'एआय'च्या माध्यमातून शेतकऱ्यांची लूट

### मुनगुंटीवार समिती अहवाल कुठेय? : रघुनाथ पाटील

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ जून -**
महायुतीने निवडणुकीच्या काळात लाडकीबहीणयोजनेसहशेतकऱ्यांची १०० टक्के कर्जमाफीचा शब्द दिला होता. महायुती सत्तेत बसली आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफीचा शब्द पूर्ण करण्यासाठी महायुती सरकारने आमदार सुधीर मुनगंटीवार समिती स्थापन केली असून, या समितीच्या अहवालाचे काय झाले? असा प्रश्न उपस्थित करून, समिती नेमायची आणि शेतकऱ्यांना फसवायचे हे सरकारचे एकमेव काम सुरू आहे. कृत्रिम बुध्दिमत्ता (ए.आय.) आणून शेतीमध्ये वापरायला सांगून, सरकार आणि त्यांचे सकारी शेतकऱ्यांना लुटू पाहत आहेत, अशी टीका शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथ पाटील यांनी शुक्रवारी येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली.

यावेळी रघुनाथ पाटील म्हणाले, राज्य सरकारने वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, राज्य बँक, बारामती अॅग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट या सर्वांनी मिळून महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कृत्रिम बुध्दिमत्तेचा (ए.आय.) वापर करून ऊस उत्पादन वाढेल ही भूमिका मांडली आहे. आतापर्यंत उत्पादन वाढवण्यासाठी शेतकऱ्यांनी खूप प्रयत्न करून व स्वतःच्या बुध्दिमत्तेचा वापर करून एकरी १३० टनापर्यंत उत्पादन घेतले आहे. परंतु, साखर कारखान्यांनी उत्पादन खर्चाएवढाही भाव उत्पादकांना दिला नाही.

त्यामुळे सोसायट्या, बँका, पतसंस्था, खाजगी सावकार यांच्या कर्जात शेतकरी अडकला आहे. या शेतकऱ्यांना पुन्हा एकरी



५० हजार रुपयांचे कर्ज देऊन वेगवेगळी साधने देऊन कर्जबाजारी करण्याचे काम सुरू केले आहे. राज्यात दूध उत्पादक शेतकऱ्यांचे भेसळीमुळे प्रचंड नुकसान होत आहे. वन्यप्राणी संरक्षण कायद्याने दरवर्षी सुमारे ४० हजार कोटींचे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. साखर कारखान्यांनी एस.एम.पी.चा कायदा बदलून एफ.आर.पी. आणला. उपपदार्थांतील ५० टक्के रक्कम शेतकऱ्यांना मिळत होती. तीही एफ.आर.पी.च्या कायद्यात गेली. यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी हे देशोधडीला लागले आहेत, असे यावेळी रघुनाथ पाटील म्हणाले. यावेळी पाटील यांनी सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांचा उल्लेख करत सरकारवर सडकून टीका केली.

यावेळी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट, क्रांतिसिंह नाना पाटील ब्रिगेडचे राज्य अध्यक्ष शिवाजी नादखिले, लक्ष्मण पाटील, राजकुमार सोमवंशी, लातूर जिल्हाध्यक्ष गजानन बोलंगे यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## नियोजीत रस्ता सोडून शेतकऱ्याच्या शेतातून तयार होतोय पाणंद रस्ता

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ जून -**
ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी राज्य शासनाचा महत्वाकांक्षी मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना अधिक प्रभावी आणि पारदर्शकपणे राबविण्याचे निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने अहमदपूर तालुक्यातील चिखली येथे नरेगा विभागांतर्गत ग्राम पंचायत पांदण रस्त्याचे काम सुरू आहे. मात्र उपलब्ध असलेला रस्ता सोडून माझ्या मुलाच्या नावे असलेल्या गट क्रमांक ५६४ मधून सदर रस्त्याचे काम केले असल्याचा गंभीर आरोप प्रल्हाद निवृत्ती कराड यांनी केला आहे.

यासंबंधीची रितसर तक्रार कराड यांनी ग्राम पंचायत कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, तहसीलदार, उप जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी यांच्याकडे केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीच्या दृष्टीने शेत रस्ते/पाणंद रस्ते महत्वाचे ठरले आहेत. मात्र ही कामे, दर्जेदार, पारदर्शक, तंटाविरहित करण्यात यावेत असे शासनाचे सक्त निर्देश असताना रस्ता सोडून शेतकऱ्याच्या शेतातून पाणंद रस्ता तयार होत असलेला हा अजब प्रकार चिखली येथे घडला आहे. सदर रस्त्याची हद्द कायम करून माझ्यावर झालेला अन्याय दूर करावा अन्यथा मला कुटुंबियांसमवेत उपोषण करण्याशिवाय पर्याय नाही असा इशारा कराड यांनी दिला आहे.

गेल्या दोन महिन्यापासून यासाठी मी चिखली, अहमपूर, लातूर येथील शासकीय कार्यालयात पाठपुरावा करीत आहे मात्र कुणीही प्रतिसाद देत नसल्याची खंत वयोवृद्ध शेतकरी प्रल्हाद कराड यांनी व्यक्त केली आहे.

## रेणापूर ग्रामीण रुग्णालयाला शासनाचा कायाकल्प पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ जून -**
लातूर जिल्ह्यातील उदगीर वगळता डायलीसीस सेवासह इतरही अत्याधुनिक सेवा मिळणारे जिल्ह्यातील एकमेव रेणापूरचे ग्रामीण रुग्णालय असून या रुग्णालयाला कायाकल्प योजनेत लातूर जिल्ह्यातून इतर रुग्णालयांच्या तुलनेत सर्वाधिक ९२ टक्के गुण मिळाल्याने २०२४-२५ वर्षाचा शासनाचा कायाकल्प पुरस्कार मिळाला आहे.

रेणापूर तालुक्यात एकूण ६६ गावे असून पाच प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. रेणापूर ग्रामीण रुग्णालय अंतर्गत असणाऱ्या गावातील १ लाख ४२ हजार नागरिकांच्या आरोग्याची २४ तास काळजी घेतली जाते. ग्रामीण रुग्णालयाच्या



वैद्यकीय अधीक्षक डॉ. अनिता अलगुले यांच्या नियोजनातून वर्षभरात जवळपास ८४ हजार रुग्णांची आरोग्य तपासणी करून उपचार करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवशीय कार्यक्रमातही विविध उपक्रम राबविल्याने छत्रपती संभाजीनगर विभागात प्रथम क्रमांक मिळविला.

रेणापूर ग्रामीण रुग्णालयातर्फे ग्रामीण भागातील गरजू व गरीब रुग्णांसाठी २४ तास शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून उपचार केले जातात. या रुग्णालयात राबवित असलेल्या विविध योजनेच्या माध्यमातून शासनाची कायाकल्प योजनेत रेणापूर ग्रामीण रुग्णालयाला लातूर जिल्ह्यातील इतर रुग्णालयांच्या तुलनेत सर्वाधिक ९२ टक्के गुण मिळाल्याने या रुग्णालयाला शासनाचा २०२४-२५ वर्षाचा कायाकल्प पुरस्कार मिळाला आहे. वैद्यकीय अधीक्षक डॉ. अनिता अलगुले म्हणाल्या, येथील ग्रामीण रुग्णालयात २४ तास आरोग्यसेवा २९ कर्मचारी बजावतात. सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी नामांकनानुसार या योजनेतील सर्व उद्दिष्टे पूर्ण केली आहेत. या रुग्णालयात अत्याधुनिक सर्व सेवा सुविधा पुरविल्या जातात. कुटूंब नियोजन शस्त्रक्रियेचे देण्यात आलेले उद्दिष्ट १०० टक्के पूर्ण करण्यात आले.

## ९ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चित

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ जून -**
विलास सहकारी साखर कारखाना, वैशालीनगर, निवळी येथे आगामी गळीत हंगामाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. गळीत हंगाम वेळेवर आणि पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी आवश्यक ती सर्व तयारी केली जात आहे. याच तयारीचा एक भाग म्हणून दि. २० जून रोजी कारखान्याच्या मिल रोलरचे पूजन चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख आणि सर्व संचालकांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या पूजनानंतर सर्व संचालकांच्या उपस्थितीत गळीत हंगाम तयारीबाबत आढावा बैठकही झाली. या वेळी येणा-या हंगामात ९ लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

विलास कारखाना कार्यक्षेत्रात



गळीत हंगाम २०२५-२६ साठी उसाचे मोठे क्षेत्र उपलब्ध आहे त्यामुळे कार्यक्षेत्रातील उसाचे वेळेवर गाळप होण्यासाठी कारखान्याचे संस्थापक चेअरमन आ. अमित देशमुख आणि चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख यांनी गळीत हंगाम लवकर सुरू करण्याच्या दृष्टीने तयारी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

या अनुषंगाने सर्व हंगामपूर्व यंत्रसामुग्री देखभाल व दुरूस्तीची कामे प्रगतिपथावर असून मागील गळीत हंगामाप्रमाणेच येणारा हंगामही यशस्वी करण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात येत आहे. आगामी गळीत हंगामासाठी कारखाना कार्यक्षेत्रात पुरेसा ऊस उपलब्ध आहे. कारखान्याकडे सभासदांच्या १४८९३.३७ हेक्टर तर बिगर सभासदांच्या ५७९० हेक्टर अशा एकूण २०६८७ हेक्टर उसाची नोंदणी झाली आहे.

विलास साखर कारखान्याने ऊस तोडणीचे योग्य नियोजन केले असून या हंगामात जास्तीत जास्त ऊस हा तोडणी यंत्राद्वारे तोडणी करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात कारखान्यामार्फत १५ हार्वेस्टर खरेदी केले जाणार आहेत. भविष्यात उसाची उपलब्धता पाहता १०० टक्के ऊस तोडणी यंत्राद्वारे केल्यानंतर उसाचे गाळप करण्यासाठी आवश्यक असणारी मशिनरी बसविण्यात येत आहे.

या हंगामात तांत्रिक कारणांमुळे कारखाना बंद तास कमी राहतील याची दक्षता घेतली जाणार आहे. हंगाम बंद असताना सुरू असलेली मशिनरी देखभाल व दुरूस्तीची कामे प्रगतिपथावर असून हंगाम सुरू होण्याअगोदरच कारखाना गळीत हंगामासाठी सज्ज असेल. कारखान्याचे कार्यकारी संचालक संजीव देसाई यांनी ही माहिती दिली आहे.


मिल रोलर पूजन कार्यक्रमास माजी आमदार व्हाईस चेअरमन वैजनाथराव शिंदे, ट्वेंटीवन शुगर्सचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, कार्यकारी संचालक संजीव देसाई, डॉ. सारिका देशमुख, माजी व्हाईस चेअरमन विद्यमान संचालक रवींद्र काळे, संचालक सर्वश्री रणजित पाटील, अनंत बारबोले, रसूल पटेल, तात्यासाहेब पालकर, गोवर्धन मोरे, हणमंत पवार, नरसिंग बुलबुले, नेताजी साळुंके (देशमुख), नितीन पाटील, रामराव साळुंके, अमृत जाधव, सतीश शिंदे (पाटील), दीपक बनसोडे, लताबाई देशमुख, शाम बरुरे, सुभाष माने, रमेश देशमुख आदी उपस्थित होते.

## गुंठेवारी व नमुना नंबर आठच्या बंद असलेल्या नोंदणीकृत खरेदीखत सुरू करण्याची मागणी



बिडकीन दि. २१ जून - महाराष्ट्र शासनाने गुंठेवारी व एन ४५,४६,४७, बी ४२ का ड व नमुना नंबर आठ च्या बंद असलेल्या नोंदणीकृत खरेदीखत रजिस्ट्री सुरु करण्याबाबत गुंठेवारी चळवळीच्या वतीने दि २० जून रोजी संभाजीनगर भारतीय जनता पक्षाचे विधान परिषदेचे आमदार संजय केनेकर यांना निवेदन देण्यात आले आहे, या निवेदनात म्हटले आहे की कमी क्षेत्राचा व्यवहार नोंदणीकृत खरेदी खत करण्यास प्रतिबंध घातला आहे, वास्तविक पाहता जमिनीच्या व प्लॉटच्या किमती आज रोजी गगनाला भिडले आहेत व सामान्य माणसाला महागडे घर घेणे आजच्या काळात शक्य नाही, त्यामुळे मध्यमवर्गीय माणूस बचत करून छोट्या क्षेत्राचे स्वतःचे घर घेऊ शकतो परंतु शासनाने वरील प्रमाणे खरेदी खत बंद केल्यामुळे सामान्य माणसाचे घर घेण्याचे स्वप्न राहत आहे, शासनाने खरेदी खत करण्यासाठी नियम व अटी कडक स्वरूपाच्या टाकून किचकट स्वरूपाची पद्धतीने खरेदीखत करते वेळी वापरण्यात येत आहे असे लेखी निवेदनात म्हटले आहे, यावेळी रवि गाडेकर, अशोक धोमाटे, विष्णू रोरे, योगेश पाटील, सुनील तायडे, काशिनाथ लिंगायत, आप्पासाहेब आम्ले, सय्यद नबी, हुसेन, यांनी निवेदन देऊन खरेदी खत चालू करण्याची मागणी केली आहे.

## श्री सरस्वती भुवन प्रशाला येथे योग दिन साजरा



बिडकीन दि.२१ जून : पैठण तालुक्यातील श्री सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथे प्रशालेतील एनसीसी विभाग, क्रीडा विभाग व गाईड विभाग या तिन्ही विभागातर्फे अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रशालेच्या १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले तर उपमुख्याध्यापक युवराज पाडळे युवराज, पर्यवेक्षिका मनीषा मिश्रा, एनसीसी ऑफिसर बाबासाहेब सोकटकर, क्रीडा शिक्षक शेख मोहम्मद आसिफ, राहुल शिंदे व गाईड शिक्षिका सुरेखा जैन उपस्थित होत्या. मुख्याध्यापक धर्मेंद्र येवले यांनी आरोग्यासाठी योगा किती महत्त्वाचा आहे हे विशद केले. एनसीसी ऑफिसर बाबासाहेब सोकटकर यांनी विश्वासाठी योगा याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशालेतील सर्वच विद्यार्थी व शिक्षकशिक्षकेतर सहकाऱ्यांनी सहकार्य केले.

## भगवती विद्यालय बिडकीन येथे आंरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्सव उत्साहात साजरा



बडकीन दि २१ जून - पैठण तालुक्यातील भगवती विद्यालय बिडकीन येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रशालेचे मुख्याध्यापक रायभान रकटे यांनी प्रथम योग दिनाचे महत्व विशद केले त्यानंतर सर्व शिक्षक व विद्यार्थी यांनी योगाचे विविध प्रात्यक्षिक, याबरोबर प्राणायाम म्हणजे काय ते नियमित केल्याने कोणकोणते फायदे होतात हें खुशाल चव्हाण यांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीधर जऱ्हाड, कमलाकर काळे, सुनील पवार रामनाथ धनवे, श्रीम विश्रांती सलगरे मॅडम, अप्पासाहेब किसवे, सुभाष राठोड, आशुतोष झारगड यांनी सहककार्य केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## एमजीएममध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि. २१: अकराव्या आंतरराष्ट्रीय योग दिवसाचे औचित्य साधून महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या योग विज्ञान विभागाच्या वतीने आयोजित योग उत्सव कार्यक्रम आज विद्यापीठाच्या चिंतनगाह येथे सकाळी ६:३० वाजता उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमात आयुष्य मंत्रालय भारत सरकार द्वारा सूचित पूरक हालचाली, योगासने, प्राणायाम व ध्यान यांचा सराव योगशिक्षक गंगाप्रसाद खरात यांनी करून घेतला. यावेळी कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आज झालेल्या या प्रशिक्षण वर्गामध्ये आयुष्य मंत्रालय भारत सरकार यांच्याद्वारे दिलेल्या मार्गदर्शन सुचनानुसार एक तासांचे प्रशिक्षण घेण्यात आले. यामध्ये सूक्ष्म आसणे, योगासने, ध्यान, प्राणायाम आदींचा समावेश होता.



नारेगांव-मांडकी कचरा डेपो बेकायदेशीर बायोमायनींग प्रकरणी ठेकेदार,मनपा आयुक्त तथा प्रशासक व घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा,यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ प्रादेशिक अधिकारी श्री मनीष होळकर व उपप्रादेशिक अधिकारी श्री ए. एस. नांदवटे यांना निवेदन देताना अ.भा.बळीराजा संघटना संस्थापक अध्यक्ष निवृत्त डक पाटील,अनिता पाटील,प्रभाकर भुसारे,लक्ष्मण टेळे, सुमित्रा गावंडे,आबासाहेब भोसले, विक्रम काकडे,ज्ञानेश्वर काकडे,छाया शेजूळ,योगेश राऊत,बापू लोखंडे, तुकाराम राऊत आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## धनाजी मोरे यांचे निधन



सोयगाव,दि.२१ जून - काळेनगर येथील सोनाजी धनाजी मोरे (वय.८४) यांचे अल्पशा आजाराने दि.२० शुक्रवार रोजी सकाळी ५ वाजता निधन झाले.त्यांचेवर दुपारी १:०० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,दोन मुली,सुना,नातवंडे असा परिवार आहे.काळेनगर येथील माजी नगरसेवक संजय मोरे यांचे काका तर सुनिल मोरे,अनिल मोरे यांचे वडील होत.

# वेरूळ येथे कैलास लेणी समोरील प्रांगणामध्ये योगा दिन उत्साहात साजरा

खुलताबाद प्रतिनिधी : वेरूळ येथील जगप्रसिद्ध कैलास लेणी समोरील भव्य प्रांगणात आंतरराष्ट्रीय योगा दिन गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत बंब यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा

सर्वजण एका ठिकाणी एकत्र येऊन स्वतःशी व इतरांची जोडण्यासाठी मन एकाग्र करून या एकाग्रतेतुन निघालेल्या तरंग आणि शांतिप्रिय कंपन हे निसर्गालादेखील मान्य असतात. म्हणून आपला भारत देश असा आहे की या निगलेल्या कंपणातून मानवी मनातील द्वेष, मत्सर, मोह, माया विध्वंसक विचार बाजूला सारून जगातील प्रत्येक व्यक्तीला जोडतो. म्हणून मानवी जीवनात योग अर्थात योगा हाच एकमेव पर्याय असल्याचे प्रतिपादन.



भारत पर्यटन कार्यालय छत्रपती संभाजीनगर व भारतीय पुरातत्व विभाग तथा एन सी सी बटालियन यांच्या संयुक्त विद्यमाने वेरूळ ता. खुलताबाद येथे आमदार प्रशांत बंब यांच्या प्रमुख उपस्थितीत आंतरराष्ट्रीय योगा दिन (दि.२१) साजरा करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी खुलताबाद तालुक्याचे तहसीलदार स्वरूप कंकाळ, एन सी सी चे कर्नल एस. आय्यप्पा, सेन्हल पाटील वरिष्ठ अधिकारी भारतीय पर्यटन विभाग छत्रपती संभाजीनगर, आर. वाकलेकर संरक्षक वेरूळ भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण भाजपा अध्यात्मिक आघाडी जिल्हाध्यक्ष आजिनाथ जाधव शहराध्यक्ष अध्यक्ष परसराम बारगळ सरपंच कुसुमताई प्रकाश मिसाळ उपसरपंच विजय राठोड ज्येष्ठ नेते सुखदेव ठेंगडे यांची उपस्थिती होती.

युनेस्कोचा जागतिक वारसा स्थळ म्हणून वेरूळ इतिहास, अध्यात्म आणि संस्कृतीच्या संगमाचे प्रतीक आहे. येथील लेण्यांच्या शांत आणि भव्य वातावरणात योग दिन साजरा करण्यासाठी निवड करण्यात आल्याचे भारतीय पर्यटन विभागाच्या व व पुरातत्त्व विभाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान हॉलिस्टिक फिटनेच्या छत्रपती संभाजीनगर येथील योग गुरू रसिका मोरे यांनी उपस्थितांना विविध योग्य प्रात्यक्षिके करून दाखवली. यावेळी मोठया संख्यने विध्यार्थी, नागरिक सरकारी अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# जगप्रसिद्ध अजिंठा लेणी येथे योग दिन साजरा

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि २१ जगप्रसिद्ध अजिंठा लेणी येथे राष्ट्रीय योग दिन करण्यात आला

यावेळी पुरातत्व विभागाचे प्रमुख मनोज पवार, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापक राज पाटील यांनी पर्यटक विभागाचे व पुरातत्व विभागाचे कर्मचारी यांनी मिळून सकाळी आठ वाजता योग दिन प्रात्यक्षिक योग करून योग दिन करण्यात आला यावेळी पुरातत्व विभागाचे प्रमुख मनोज पवार यांनी स्वतः योग करून कर्मचारी यांच्या सोबत योग करून योग चे प्रकार सांगून माहिती हि दिली तसेच पवार यांनी स्वतः शिरसासन केले यांनी सर्व योगसन करून दाखविले आणि कर्मचारी यांच्या कडून करून घेतली



या जगप्रसिद्ध अजिंठा लेणी मध्ये निसर्ग रम्य वातावरणात योग दिन साजरा करण्यात आला

# पैठणला ठिकठिकाणी योगदिन साजरा

तभा वृत्तसेवा

पैठण दि २१ :- पैठणला प्रमुख शाळा, हायस्कूल महाविद्यालय शासकीय ऑफिस तसेच ग्रामीण आरोग्य पथक येथे ठिकठिकाणी आंतराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला.

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई द्वारा संचलित आर्य चाणक्य विद्यामंदिर पैठण येथे आंतरराष्ट्रीय योगदिन संपन्न झाला.तसेच ग्रामीण आरोग्य पथक येथे वरिष्ठ अधिकारी डॉ सव्वाशे यांच्या मार्गदर्शनाखाली योगदिन संपन्न झाला.

आरोग्यम् धन संपदा...

या उक्तीनुसार व्यायामाचे महत्त्व सांगणारे हे सुभाषित आहे. या दृष्टीने १५व्या आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या औचित्याने पैठण



येथील आर्य चाणक्य विद्यामंदिर मधील इयत्ता पहिली ते दहावी मधील विद्यार्थ्यांनी उत्तम सहभाग नोंदविला.अध्यक्ष वकील महासंघ व प्रशिक्षक आर्ट ऑफ लिव्हिंग, पैठण अँड. संदीप जाधव यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे व्हॉलेंटियर आर्ट ऑफ लिव्हिंग अँड संदीप शिंदे व गणराज दहिवाळ यांनी प्राणायमाचे प्रात्यक्षिक करून दाखविले.

याप्रसंगी मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमा पुजन करून योग प्रात्यक्षिके सादर करण्यात आली त्यामध्ये सर्वप्रथम प्रार्थना, उभी व बैठे आसने, पोटावरील पाठीवरील आसने, संकल्पमंत्र, शांती पाठ व ध्यान इ. विविध योग - प्राणायाम प्रकारांचे प्रात्यक्षिक करून योगाचे महत्त्व सांगण्यात आले. विजय चाटुपळे यांनी अध्यक्षीय समारोपात विद्यार्थ्यांना योगाने जिवनात सकारात्मक बदल होतात म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने दररोज योगासने करावी असे मार्गदर्शन करून योगदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष विजय चाटुपळे, मा. नगराध्यक्ष सुरज लोळगे, संचालक शरद बिडकर,मा. नगरसेवक बंडू आंधळे, सुरेश गायकवाड,गणेश डुकरे, कैलास बरकसे,लहु गायकवाड,देविदास शेळके ,प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका ज्योती जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. त्याच प्रमाणे ग्रामीण आरोग्य पथक (घाटी)याठिकणी समस्त डॉक्टरांच्या उपस्थितीत योगाचा सराव करण्यात आला.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री.व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक: ३०१/२०२५ पु. ता. : २९/०७/२०२५

अर्जदार : १- अनिता पुरुषोत्तम शर्मा, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. सरस्वती कॉलनी, कन्नड, ता. कन्नड, जिल्हा संभाजीनगर २- कृष्णा पुरुषोत्तम शर्मा, वय २८ वर्षे, धंदा नौकरी, रा. सरस्वती कॉलनी, कन्नड, ता. कन्नड, जिल्हा संभाजीनगर ३- तुलशी पुरुषोत्तम शर्मा, वय २६ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सरस्वती कॉलनी, कन्नड, ता. कन्नड, जिल्हा संभाजीनगर

- विरुध्द-

गैरअर्जदार - महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद /छत्रपती संभाजीनगर

अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत..

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. एम.एम. भारुका यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार १ चे पती व अर्जदार २ व ३ चे वडील नामे पुरुषोत्तम हरीप्रसाद शर्मा यांचा दिनांक ८.११.२०२४ रोजी कन्नड, ता. कन्नड येथे मृत्यु झालेला असून त्यांच्या पश्चात अर्जदार १ ते ३ हेच केवळ वारस असून अर्जदारां व्यतीरिक्त मयतास ईतर कोणतेही वारस नाही. अर्जदार क्रमांक १ त्यांचे मयत पती नामे पुरुषोत्तम हरीप्रसाद शर्मा मृत्युपूर्वी कन्नड, ता. कन्नड येथील कायमचे रहिवाशी असून मोल मजुरी करुन अर्जदार क्रमांक १ ते ३ यांचा उदरनिर्वाह करीत होते. अर्जदारास वरील प्रमाणे मयत पुरुषोत्तम हरीप्रसाद शर्मा यांच्या मृत्यु पश्चात वारसा हक्काने मिळणारे सर्व हक्क व अधिकार तसेच शासकीय व निमशासकीय फायदे व अभिलेखात नोंदी घेण्या करीता वारस प्रमाण पत्र आवश्यक आहे. सदरील शासकीय कामकाजात सक्षम न्यायालयाच्या वारसा प्रमाण पत्रा शिवाय अर्जदाराचे हक्क व अधिकार बजावण्या करीता अडचण निर्माण झालेली असल्यामुळे प्रस्तुतच्या अर्जास दिनांक १९/०५/२०२५ रोजी कारण घडले आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक १७/०६/२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक : १८/०६/२०२५

आदेशावरुन

लिपीक | सहा. अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती आर.एस. तापडीया मॅडम, सह-दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक : २९३/२०२५

पुढील तारीख : १९/०७/२०२५

अर्जदार १- सुशिलाबाई पांडुरंग चौधरी, वय ७० वर्षे, धंदा घरकाम, रा. हिवरखेडा रोड, कन्नड, ता. कन्नड, जिल्हा संभाजीनगर २. सुनिता भ्र. रमेश चौधरी, वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. हिवरखेडा रोड, कन्नड, ता. कन्नड, जिल्हा संभाजीनगर ३-जयेश रमेश चौधरी, वय १७ वर्षे, अ.पा.क. अर्जदार क्रं. २, सुनिता रमेश चौधरी रा. हिवरखेडा रोड, कन्नड, ता. कन्नड, जिल्हा संभाजीनगर ४- रोशनी रमेश चौधरी, वय २२ वर्षे, अ.पा.क. अर्जदार क्रं. २, सुनिता रमेश चौधरी रा. हिवरखेडा रोड, कन्नड, ता. कन्नड, जिल्हा संभाजीनगर

- विरुध्द

गैरअर्जदार - महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद / छत्रपती संभाजीनगर

अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत..

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. एम.एम. भारुका यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार १ चा मुलगा व अर्जदार २ ते ४ चे पती / वडील नामे रमेश पांडुरंग चौधरी यांचा दिनांक ४.५.२०२३ रोजी कन्नड, ता. कन्नड येथे मृत्यु झालेला असून त्यांच्या पश्चात अर्जदार १ ते ४ हेच केवळ वारस असून अर्जदारां व्यतीरिक्त मयतास ईतर कोणतेही वारस नाही. अर्जदार क्रमांक २ त्यांचे मयत पती नामे रमेश पांडुरंग चौधरी मृत्युपूर्वी हिवरखेडा रोड, कन्नड, ता. कन्नड येथील कायमचे रहिवाशी असून मोल मजुरी करुन अर्जदार क्रमांक १ ते ४ यांचा उदरनिर्वाह करीत होते. अर्जदारास वरील प्रमाणे मयत रमेश पांडुरंग चौधरी यांच्या मृत्यु पश्चात वारसा हक्काने मिळणारे सर्व हक्क व अधिकार तसेच शासकीय व निमशासकीय फायदे व अभिलेखात नोंदी घेण्या करीता वारस प्रमाण पत्र आवश्यक आहे. सदरील शासकीय कामकाजात सक्षम न्यायालयाच्या वारसा प्रमाण पत्रा शिवाय अर्जदाराचे हक्क व अधिकार बजावण्या करीता अडचण निर्माण झालेली असल्यामुळे प्रस्तुतच्या अर्जास दिनांक ०९/०५/२०२५ रोजी कारण घडले आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक १७/०६/२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले,

दिनांक २०/०६/२०२५

आदेशावरुन

लिपीक | सहा. अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

## बिडकीन येथील ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



बिडकीन दि २१ जून -पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणीक संस्था संचलीत ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षांच्या हस्ते सरस्वती पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय योगा संस्थेचे पदाधिकारी व शिक्षक मधकर पवार सर व गोरख शिंदे सर तसेच मंचावर शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला, शाळेच्या मुख्यध्यापीका सविता तोतला हे उपस्थीत होते. शाळेच्या शिक्षिका सोनाली खोंड यांनी अध्यक्षांचा परीचय करून दिला. शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला यांच्या हस्ते मान्यवरांचा शाल व श्रीफळ देवुन सत्कार करण्यात आला. तसेच शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतीश तोतला यांनीही विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व सांगितले. त्यानंतर मधुकर पवार सर व गोरख शिंदे सर यांनी विद्यार्थ्यांकडून योगा करुन घेतले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन शालेय विद्यार्थी समितीने केला. वर्षा चव्हाण, काजल देशमुख, सोनाली खोंड, भारती जाधव, प्रकाश करोडिवल, कृष्णा भालेराव, अनिल जाधव, चव्हाण सर, दत्तात्रय चेडे, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परीश्रम घेतले. राष्ट्रगीतेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## जाहीर प्रगटन

**मा. विदयामान दिवाणी न्यायाधिश (क स्तर) न्यायालय गंगापुर नि. छ. संभाजीनगर (मा कळमकर साहेब कोर्ट)**

दि.कि.अर्ज नं.४१३/२०२५.

अर्जदार : १) रहीमसाहब नवाब सय्यद वय ५८ वर्षे, धंदा शेती, २) हारूण नवाब सय्यद वय ५३ वर्षे, धंदा शेती, दोघे रा. घोडेगांव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) बडेसाहब नवाब सैय्यद, वय ५१ वर्षे, धंदा शेती, दोघे रा. वलभभाईनगर ता. पिंप्री चिंचवड जि.पुणे ४) समीना मुजीब सय्यद, वय ३८ वर्षे, धंदा शेती, ५) आमन मुजिब सय्यद, वय १७ वर्षे, धंदा शिक्षण, ६) आयान मुजिब सय्यद, वय १५ वर्षे, धंदा शिक्षण, ७) आवेज मुजिब सय्यद, वय १४ वर्षे, धंदा शिक्षण, ८) आयाज मुजिब सय्यद, वय १२ वर्षे, धंदा शिक्षण, अर्जदार नं. ५ ते ८ यांना अ.पा.क. जनक माता अर्जदार नं. ४ नामे समीना मुजीब सय्यद सर्व रा. घोडेगांव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ९) साजिद नवाब सय्यद, वय ३७ वर्षे, धंदा - शेती, रा. घोडेगांव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर १०) नुरजहा युनूस पठाण, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. लोहगांव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर ११) अफसरबी अजहर पठाण, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम, रा. बिडकीन ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर १२) बिलकिस रहीम शेख, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. नायगांव पो. वाळुज ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर विरूध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टनुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मा. न्यायालयात कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टनुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज श्री. ए.एस. करडे गंगापुर विधीज्ञ यांच्यामार्फत अर्ज सादर केला, असुन अर्जदार हे वरील ठिकाणाचे कायमचे रहीवाशी असुन अंसुन अर्जदार नं. १ ते ३ व ९ ते १२ यांचे वडील व अर्जदार नं. ४ यांचे सासरे व अर्जदार नं. ५ ते ८ यांचे आजोबा नामे नबाव मेहबुब सयंद हे दिनांक २४/०१/२००९ रोजी व अर्जदार नं. १ ते ३ व ९ ते १२ यांचे आई व अर्जदार नं. ४ यांचे सासु व अर्जदार नं. ५ ते ८ यांचे आजी नामे जुगनाबी नबाव सय्यद हे दिनांक १७/१२/२०१४ रोजी मौजे घोडेगांव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झाले असुन अर्जदार नं. ५ ते ८यांचे वडील व अर्जदार नं. ४ यांचे पती नामे मुजिब नबाव सय्यद हे दिनांक २७/०१/२०१९ रोजी मौजे घोडेगांव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झाले असुन मयत नबाव मेहबुब सय्यद व जुगनाबी नबाव सय्यद यांना अर्जदार हे कायदेशिर वारसदार आहे अर्जदार यांना मयत नबाव मेहबुब सय्यद व जुगनाबी नबाव सय्यद यांच्या वारसप्रमाणपत्र हे कार्यालयीन व शासकीय कामासाठी आवश्यकता आहे. सदरील वारसप्रमाणपत्र देण्यास अर्जदारांच्या नावाने देण्यात यावे.

त्याअर्थी याबाबत आपला काही आक्षेप अथवा उजर असल्यास तीस दिवसाच्या आत स्वःता अथवा त्यांच्या विधीज्ञामार्फत या न्यायालयात सादर करावा नसता मुद्दतीनंतर वरील अर्जदाराच्या अर्जावर आपला कोणताही आक्षेप नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही केली जाईल. करिता आज दिनांक २०/०६/२०२५ रोजी सही व शिक्कानिशी देत आहे

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक | साहय्यक अधिक्षक

मा. दिवाणी क स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

## जाहिर प्रगटन

**मा. डी. एस. तांबे दिवाणी न्यायाधीश साहेब, क स्तर, कन्नड, यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज नं. २८५/२०२५ पुढील तारीख २५/०७/२०२५

अर्जदार - १. गोविंदा आनंदा नवले, वयः ८४ वर्ष, धंदाः शेती, रा. दिगर, पिशोर, ता. कजड जि. औरंगाबाद, २. लिलाबाई दुलाजी खडके, वयः ७२ वर्ष, धंदाः घरकाम, दिगर, पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद ३. हरी आनंदा नवले (मयत) ३.१. भिमाबाई हरी नवले. वयः ७६ वर्ष, धंदा घरकाम, रा. दिगर, पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद ३.२. शिवाजी हरी नवले वयः ५४ वर्ष, धंदाः नोकरी, रा. पिशोर, ता. कनड जि. औरंगाबाद ३.३. दिलीप हरी नवले वयः ५३ वर्ष, धंदाः शेतो, रा. दिगर, पिशोर, ता. कनड जि. औरंगाबाद. ३.४. कैलास हरी नवले वयः ४९ वर्ष, धंदाः शेती. रा. दिगर, ता. कन्नड जि. औरंगाबाद, ३.५. ज्ञानेश्वर हरी नवले वयः ४८ वर्ष, धंदा शेती, रा. दिगर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. सुभाष आनंदा नवले (मयत) ४.१ सुनिता सुभाष नवले वयः ५५ वर्ष, धंदाःघरकाम, रा.दिगर, पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद, ४.२ अरुण सुभाष नवलं वयः ३८ वर्ष, धंदा. शेती, रा. दिगर, पिशोर, ता. कब्रड जि. औरंगाबाद, ४.३. मोहिनी भगवान भागवत वयः ३० वर्ष, धंदाः घरकाम, रा. उंडणगाव, ता. सिल्लोड जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदारः महाराष्ट्र शासन, व्दारा जिल्हा अधिकारी कार्यालय औरंगाबाद. अर्जदार क्र. १ तं४.३ हैं मयत नामे आनंदा लाइ नवले व अर्जदार क्र.३ मयत नामे हरी आनंदा नवले व अर्जदार क्र. ४ मयत नाम सुभाष

अर्ज : आनंदा नवले यांचे कायदेशीर वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याआर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. डी.एफ. म्हस्के यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे को. अर्जदार क्र. १ ते ४.३ हे वरील प्रमाणे कायमचे रहिवासी आहे. मयत नामे आनंदा लाडु नवले व अर्जदार क्र.३ मयत नामं हरी आनंदा नत्रले व अर्जदार क्र. ४ मयत नामे सुभाष आनंदा नवले यांचे अर्जदार क्र. १ व २ मुलं असून अर्जदार क्र. ४ व ५ हि मयत मुले होनी, अर्जदार क्र. १ ते ३व ४ मुले व मुलगी आहे अर्जदार क्र.३.१ व४.१ हि सुन तसेच अर्जदार क्र.३.२ ते ४.३ हि नातु आहे. नामे मयत नाम आनंदा लाडू नवले व अर्जदार क्र.३ मयत हरी आनंदा नवले व अर्जदार क्र. ४ मवत नामे सुभाष आनंदा नवले यांना अर्जदार क्र. १ ते४.३ व्यतिरीक्त कोणीही वारस नाहीत मयत आनंदा लाडु नवले अर्जदार क्र.१ ते ३ व ४ चे वडील व २.१ व ४.१ यांचे सासरे व ३.२ ते ४.३ यांचे आजोबा हे दि २८/०९/१९९२ रोजी मयत झालेलं आहे. तसेच त्यांचा अंत्यसंस्कार हा पिशोर, ता. कन्नड येथे करण्यात आलेला आहे. मयत बुढानी पांडु नवले यांना अर्जदारांशिवाय कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयन यांना मिळणारा शासकीय निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच संबंधित तलाठी यांनी मयताच्या नावे असलेल्या स्थावर तसंच जंगम मिळकतीमध्ये वारसाचा नोंद घेण्यासाठी मा. न्यायालयातून वारस प्रमाणपत्र आणायचे सांगितलं त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास कारण घडले, अर्जदार यांनी सदर अर्जाव्यतिरोक्न इतर कोणत्याही मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला नाही. त्याआथर्थी सदर जाहीर प्रगटन व्दारे सर्व जनतेस कळवण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्या नुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्या बाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप बर्गर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आंत आपला उजेर, आक्षेप मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उर्जर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह धरला जाणान नाही, याची नोंद घ्यावी.

दि. १७/०६/२०२५

आदेशावरुन

लिपीक | सहा. अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

## अग्रलेख...

# हानिकारक युद्धोन्माद

रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध अद्याप अधिकृतपणे संपले नसताना इराण आणि इस्रायल यांच्यातील संघर्ष थांबण्याचे नाव घेत नाही, उलट तो दिवसेंदिवस वाढत आहे. या संघर्षाने मध्य पूर्वेतीलच नाही तर जगातील शांततेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. या संघर्षात इस्रायलसमोर इराण थोडा कमकुवत वाटत असला तरी त्याने अद्याप माघार घेतलेली नाही, शरणागती पत्करली नाही. उलट तो इस्रायलचे मोठे नुकसान करीत आहे. या दोन देशांतील संघर्षाचा शेवट कसा होणार, हे आताच सांगता येणार नसले तरी यामुळे जगात अस्थिरता निर्माण होणार, महागाईचा आगडोंब उसळणार आणि गरीब तसेच मध्यमवर्गीयांचे जीवन संकटात येणार यात शंका नाही. इराणच्या संभाव्य अण्वस्त्रसज्जतेचा आपल्या अस्तित्वाला धोका आहे, या गृहीतकातून हा संघर्ष सुरू झाला. इस्रायलने इराणवर जबर हल्ला केला, त्याला इराणनेही तेवढेच तोडीसतोड प्रत्युत्तर दिले. पाकिस्तानजवळ अण्वस्त्रे असताना अण्वस्त्रसज्ज होणारा इराण हा दुसरा मुस्लिम देश म्हणायला पाहिजे. त्यामळे इस्रायलची आशंका नाकारता येत नाही. मुळात चिमुकला इस्रायल चारही बाजूंनी अरब देशांनी घेरलेला आहे. अमेरिकेच्या भक्कम पाठिंब्यामुळे तसेच आपल्या चिवट आणि लढाऊ वृत्तीनेच तो देश आतापर्यंत जगात आपले अस्तित्व टिकवून आहे, यात शंका नाही. ज्याक्षणी इस्रायलची आक्रमकता कमी होईल वा संपुष्टात येईल, त्यावेळी त्याच्या आजूबाजूचे मुस्लिम देश त्याचा घास घेतल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे आक्रमक राहणे ही इस्रायलची गरज आहे. परिणामी स्वसंरक्षणातून इस्रायलने इराणवर हल्ला केला आहे. त्यामुळे जी-७ देशांच्या नुकत्याच झालेल्या शिखर परिषदेनेही एकमुखी ठराव करत इस्रायलला स्वसंरक्षणाचा हक्क असल्याचा निर्वाळा दिला आहे.

आता इस्रायलच्या बाजूने अमेरिका या युद्धात उतरण्याची शक्यता वाढली आहे. कारण इराण हा अमेरिकेसाठीही डोकेदुखी झाला आहे. अमेरिकेलाही तो जुमानेसा झाला आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात आपण युद्धबंदी घडवून आणल्याचा वारंवार दावा करणारे डोनाल्ड ट्रम्प इराण आणि इस्रायल यांच्यात युद्धबंदी का घडवून आणू शकत नाही, याचे उत्तर इराणच्या या आक्रस्ताळ्या अमेरिकाविरोधी भूमिकेत दडले आहे.

अनावश्यक आक्रमकता दाखवत अयातुल्ला खामेनेई स्वत:सोबत इराणचे तसेच तेथील जनतेचेही नुकसान करीत आहेत. भारत-पाक अल्पकालीन संघर्षात ट्रम्प यांनी मध्यस्थी केल्याचा दावा भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने पुराव्यानिशी वारंवार खोडून काढला आहे. इस्रायलच्या बाजूने इराणविरुद्धच्या युद्धात उतरायचे की नाही, तसेच इराणवर थेट हल्ला करायचा की नाही, याबाबतचा निर्णय ट्रम्प यांनी आपल्या उतावळ्या स्वभावाला न शोभणारा संयम आणि राजकीय मुत्सद्देगिरी दाखवत १५ दिवस पुढे ढकलला आहे. अन्यथा इराण आणि इस्रायल यांच्यातील संघर्षाला आणखी फाटे फुटले असते. जगातील अन्य देशांनाही आपल्या राष्ट्रीय हितसंबधांच्या रक्षणासाठी नाईलाजाने या युद्धात उतरावे लागले असते आणि त्याची परिणती तिसऱ्या महायुद्धात झाली असती.

चिमुकला युक्रेन ज्याप्रमाणे बलाढ्य रशियाशी लढत आहे, त्याप्रमाणे इराणला चिमुकला देश म्हणता येत नसले, कारण तो भौगोलिक क्षेत्र आणि लोकसंख्येच्या बाबतीत इस्रायलपेक्षा कितीतरी मोठा असला तरी, इस्रायलच्या लष्करी आणि तंत्रज्ञानविषयक ताकदीपुढे चिमुकलाच ठरतो, झुंज देत आहे. अमेरिका आपल्या पूर्ण ताकदीने या युद्धात इस्रायलची फक्त पाठराखणच करत नाही तर त्याच्या बरोबरीने युद्धात उतरायला सज्ज झाल्यामुळे इराणचे भविष्य अंधकारमय झाल्यासारखे दिसते आहे.

इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांचा खात्मा करण्याचा तसेच इराणचा विध्वंस करण्याचा इशारा दिला आहे. खामेनेई यांना संपवल्याशिवाय हा संघर्ष थांबणार नसल्याचा इशाराही नेतान्याहू यांनी दिला आहे. इस्रायलच्या क्षेपणास्त्र आणि बॉम्बहल्ल्यात इराणचे आतापर्यंत दोन लष्करप्रमुख मारले गेले आहेत. हा इराणला बसलेला मोठा धक्का म्हणायला पाहिजे. खामेनेई यांना संपवण्यात इस्रायलला यश आले तर ती त्या देशाची मोठी उपलब्धी म्हणायला पाहिजे. आजपर्यंत कोणत्याही युद्धात त्या देशाचा प्रमुख मारला गेला, असे झाले नाही. अमेरिकेच्या सक्रिय मदतीशिवाय खामेनेई यांना संपवण्यात इस्रायल यशस्वी होऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. खामेनेई यांचा काटा काढावा असे अमेरिकेला वाटत असेल तरच खामेनेई पैगंबरवासी होऊ शकतात. त्यांनी शरणागती पत्करावी, असा इशारा अमेरिकेने दिला असताना खामेनेई यांनी उलट अमेरिकेलाच डोळे दाखवले आहेत. अमेरिकेने या संघर्षापासून दूर राहण्याचा इशारा दिला आहे. खामेनेई यांनी अमेरिकेला दरडावणे म्हणजे उंदराने हत्तीला धमकावण्यासारखे आहे.

कोणत्याही युद्धाने दोन्ही बाजूंच्या हानीशिवाय फार काही साध्य होत नाही. त्यामुळेच युद्ध हा कोणत्याही समस्येवरचा उपाय नाही, असे म्हटले जाते. युद्धात जो देश पराभूत होतो, त्याचे तर अपरिमित नुकसान होते, पण जो देश युद्धात जिंकतो, त्याचीही हानी कमी झाली नसते. अगदी कौरव-पांडवांच्या युद्धापासून आपण याचा अनुभव घेतला आहे. तुमची बाजू बरोबर आहे, न्याय्य आहे, म्हणून तुमचे युद्धात नुकसान होत नाही, असे कधी होत नाही. पण काही वेळा युद्ध हे लढावे लागते, कधी ते आपल्या इच्छेने असते, तर कधी ते तुमच्यावर लादलेले असते. इराण आणि इस्रायल युद्धात अमेरिका उतरलीच तर या युद्धाची व्याप्ती आणि गांभीर्य आणखी वाढू शकते. चीन, रशिया, उत्तर कोरिया आदी देशांनी अमेरिकेला संयमाचा इशारा दिला आहे. अमेरिका इस्रायलच्या बाजूने युद्धात उतरला तर हे तीन देश इराणला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पाठिंबा देण्याची शक्यता नाकारता येत नाही. आज इराण आणि इस्रायल संघर्षामुळे मध्य पूर्वेतील शांतता धोक्यात आली, तेथे तणावाचे वातावरण निर्माण झाले. उद्या चीन, रशिया आणि उत्तर कोरिया यांना इराणच्या बाजूने युद्धात उतरावे लागले तर तिसरे महायुद्ध अटळ म्हटले पाहिजे. पहिल्या दोन महायुद्धांमध्ये झालेल्या हानीतून जग अजूनही सावरले नसताना तिसऱ्या महायुद्धाचे सावट जगावर आल्यासारखे दिसत आहे. त्यामुळे सगळ्या प्रमुख देशांनी एकदुसऱ्याला संयमाचे आवाहन करण्यापेक्षा स्वत: संयमाने वागले पाहिजे. ही जबाबदारी छोट्या देशांपेक्षा चीन, रशिया आणि अमेरिकेसारख्या मोठ्या देशांची अधिक आहे. एकदा का तिसरे महायुद्ध सुरू झाले तर सगळ्या देशांना, ज्यांचा या युद्धाशी दूरान्वयेही संबंध नाही, त्यांनाही युद्धाची झळ पोहोचते, त्यांनाही त्यांची इच्छा असो वा नसो, नाईलाजाने युद्धात उतरावेच लागते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर युद्धात तुम्ही ओढले जाता वा तुम्हाला युद्धात ढकलले जाते. तुम्ही फार काळ तटस्थ राहू शकत नाही. त्यामुळे अजूनही वेळ गेलेली नाही. जगाला तिसऱ्या महायुद्धापासून वाचवणे, ही सगळ्यांची जबाबदारी आहे. इराण आणि इस्रायल युद्धात चूक कोण, बरोबर कोण या फंदात न पडता त्या दोन्ही देशांना चर्चेसाठी एकत्र आणले पाहिजे.

युद्ध सुरू करणे हे सोपे असते, पण युद्ध थांबवणे कठीण असते. मुळात युद्ध सुरू करताना कुठे थांबावे हे समजले पाहिजे. युद्ध म्हणजे तुमच्या शत्रूला धडा शिकवणे असते, पूर्णपणे संपवणे नसते. या दृष्टीने भारताचे उदाहरण युद्धखोर देशांनी आपल्यासमोर ठेवले पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानच्या विनंतीवरून अचानक युद्धबंदी लागू केली, भलेही याचे श्रेय लाटण्याचा अश्लाघ्य प्रयत्न अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प करत असले तरी हा निर्णय मोदी यांचाच आहे, यात शंका नाही. नेता तोच असतो, ज्याला कुठे थांबायचे ते समजते. देशाला युद्धाच्या खाईत लोटणारा हा नेता असू शकत नाही. मग तो नेता ट्रम्प असो, नेतान्याहू असो की, अयातुल्ला खामेनेई. हे सगळे युद्धोन्मादात आपल्या देशाचे नुकसान करीत आहेत.

## श्रद्धांजली

**डॉ. चंद्रकांत रागीट**

# ‘बाप’माणूस जातो तेव्हा...

जानेवारी महिन्याच्या २५ तारखेला सायंकाळी पद्म पुरस्कारांची घोषणा होत होती. श्री नरकेसरी प्रकाशन लि.चे अध्यक्ष डॉ. विलास डांगरे यांना पद्मश्री मिळाली म्हणून डॉ. रवींद्र कोल्हे यांचा फोन आला. लगेच त्यांच्या घरी जाण्यासाठी निघालो तर पुढचा फोन आला की मारुती चितमपल्ली यांनाही पद्मश्री मिळाली. मी थोडा जमिनीवरून दोन तीन फूट उडालोच. कारण या तीनही पद्मश्रींसोबत माझा घरोबा आहे.

लगेच डॉ. विलास डांगरे यांच्याकडे गेलो. त्यांचे मारुती चितमपल्ली यांच्यासोबत फोनवर बोलणे करून दिले. मुख्य म्हणजे डॉ. विलास डांगरे यांचे मारुती चितमपल्ली पेशंट होते. बरीच वर्षे त्यांना डॉ. डांगरेंकडे घेऊन जाण्याची व नंतर त्यांचे औषध सोलापूरला पाठवायची जबाबदारी असायची.

मी, जिल्हा माहिती अधिकारी अनिल गडेकर आणि साहित्य प्रसार केंद्राचे मकरंद कुलकर्णी असे आम्ही तिघे मारुती चितमपल्ली यांचे नागपूरमधील केअर टेकर होतो. नागपुरात मुक्कामी असताना त्यांच्या पत्नी व नंतर प्रसिद्ध लेखिका मुलगी छाया चितमपल्ली यांचे देहावसान झाल्यानंतर ते एकाकी पडले होते. तेव्हा आम्ही तिघेही मिळून त्यांची काळजी घेत होतो. तेव्हा तर त्यांनी नागपूरच्या वकिलाकडे मृत्युपत्र बनविले होते व आम्हा तिघांना अग्निसंस्काराचा अधिकार दिला होता.

नागपुरात त्यांचे घर लक्ष्मीनगरात दुसऱ्या मजल्यावर होते व कधी कधी तर तापाने फणफणत असताना दार उघडायला सुद्धा त्यांना जमत नव्हते, तेव्हा पुढील देखभाल व्यवस्थित व्हावी म्हणून त्यांची व्यवस्था वर्धेच्या हिंदी विश्वविद्यालयामध्ये केली होती. अनायासे महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय वर्धा येथे मी कार्यकारी परिषदेवर सदस्य व नंतर प्रति कुलपतिपदावर कार्यरत असल्यामुळे त्यांची तेथे अतिथी लेखक म्हणून नियुक्ती केली होती. लेखकाचे मानधनही मिळायचे व त्यांची तेथील गेस्ट हाऊसवर निवास व्यवस्थाही झाली होती. तिथे त्यांचे लेखनकार्य तब्बल २७ महिने चालले व तेथील रिसर्च करणाऱ्या विद्यार्थ्यांना सुद्धा त्यांचा लाभ मिळाला. मारुती चितमपल्ली यांचा भरपूर सहवास व त्यांची सेवा करण्याचा लाभ मिळाला हे माझे सौभाग्य आहे. त्यांना



घेऊन बऱ्याच जंगलात आम्ही फिरलो. नागझिरा, नवेगावबांध येथील माधवराव पाटील, किनवट येथील डॉ. बेलखोडे यांच्याकडे, माहूरच्या जंगलात, मेळघाटच्या जंगलात भरपूर फिरलो.

मेळघाटच्या आमच्या संस्कार शिबिरात ते मुक्कामी असायचे. एक वर्ष तर आमच्या ७ दिवसांच्या सायकल यात्रेत ते पूर्ण दिवस गाडीने सोबत आले होते आणि वडाच्या झाडावर कलम कशी बांधायची म्हणजे मूळ झाडाच्या वयाचे पुढील कलम केलेले झाड तयार होईल हे विद्यार्थ्यांना सहज सांगत होते. त्याच कारणांमुळे पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे, पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे, पद्मश्री डॉ. विलास डांगरे यांच्याप्रमाणेच पद्मश्री मारुती चितमपल्ली यांच्या सहवासाचे सौभाग्य मिळाले.

त्यांच्या खूप आठवणी व अनुभवाचे गाठोडे सोबत आहे. बऱ्याचदा मंचावरून त्यांची मुलाखत घेण्याची संधी सुद्धा मला मिळाली. जंगलात फक्त वाघ बघायला जाऊ नका तर बाकी पशु-पक्षींचे निरीक्षण कसे करायचे ते हे सुद्धा शिकवत होते. जंगलातील मुंग्यांचे वारुळ हे जंगलात वाट चुकलेल्या लोकांसाठी होकायंत्राचे काम कसे करतात हे बघायला शिकविले. दुष्काळात माकड कसे आपल्या पिलांसाठी तहान लाडू व भूक लाडू बनवून ठेवतात, थंडीमध्ये माकडे कशी शेकोटी भोवताल बसून लाकडे न जाळता शेकोटीची ऊब घेतात असे अनेक जंगलातल्या व निसर्गाच्या चमत्कारिक गोष्टी त्यांच्या साहित्यातून शिकायला मिळतात.

एकदा तर संभाजी नगरचे ३७ मित्र त्यांच्या निमंत्रणावरून नागझिरा बघायला आलेले आणि मारुतराव पद्मश्री डॉ. विक्रम मारवाह यांच्या हॉस्पिटलला भरती होते. त्यांचे जंगलावरचे प्रेम इतके की, डॉ. मारवाहांना आग्रह करून, विशेष व्यवस्था करून दुसऱ्या दिवशी आमच्यासोबत जुळले. रात्रभर सर्वांशी जंगलातील अनुभव सांगत होते आणि प्राण्यांच्या रात्रीच्या आवाजावरून आता जंगलात काय घडत आहे याचे चित्र उभे करून दाखवीत आणि जंगलातून परत आल्यावर पुन्हा डॉ. मारवाहांकडे भरती झाले.

पद्मश्री मिळाल्यावर पत्नीसह अनिल गडेकर. मंजूषा रागीट आणि मी फेब्रुवारीत सोलापूरला जाऊन भेटून आलो. त्यावेळेस वाटले नव्हते की ते इतक्या लवकर जातील. दिल्लीला पद्मश्री घेऊन आल्यानंतर त्यांची तब्येत ढासळली व काल हृदयाचा ठोका चुकविणारी बातमी मिळाली. मन सुन्न झाले. आपल्याला अग्निसंस्काराचा अधिकार देणारा बाप-माणूस गेल्याचे दुःख झाले . सकाळी पद्मश्री डॉ. विलास डांगरे यांचा फोन आला. सर्व आठवणींना डॉ. डांगरे यांनी उजाळा दिला. त्यांच्यासोबत घालविलेल्या, क्षणांच्या आठवणी लिहायला घेतले तर मोठे पुस्तक होईल, एवढे त्यांच्यासोबतचे अनुभव व प्रसंग स्मृतिपटलावर येऊन गेलेत. मुलगा ले. कमांडर पार्थ आणि मुलगी डॉ. गायत्रीवर त्यांचा आशीर्वाद होता. त्यामुळे कोरोना काळात वर्धेला असताना तासन् तास गप्पा मारायचे आणि मुलांचे जीवन समृद्ध करत होते. पद्मश्री मारुती चितमपल्ली यांच्या बऱ्याच आठवणी आहेत. त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन.

पूर्व प्रति कुलपती,
हिंदी विश्वविद्यालय, वर्धा

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# हिंदीचा द्वेष का?

राज ठाकरेंनी २००६ साली आपल्या राजकारणाची सुरुवात हिंदी द्वेषापासून केली होती. मासेमारांच्या एका मेळाव्यात हिंदीवर हल्ला केला. त्यामुळे मग हिंदीभाषिकांवर हल्ले झाले. रेल्वेच्या परीक्षेला आलेल्या विद्यार्थ्यांवर हल्ले केले आणि मुंबई, महाराष्ट्रात मराठीचा मुद्दा म्हणजे हिंदीचा द्वेष असं त्यांचं राजकारण सुरू झालं. त्याचा फार काही लाभ झाल्याचं जेव्हा राज ठाकरेंना लक्षात आलं, त्यानंतर त्यांनी सोयीस्करपणे हिंदी बाजुला करून ते हिंदूंकडे, हिंदुत्वाकडे वळले. आणि आता ते परत हिंदू बाजूला ठेवून हिंदीकडे वळले आहेत. अशा बेभरोशे पलटूराम माणसावर विश्वास कसा ठेवायचा असा प्रश्न आता निर्माण झाला आहे.

खरं पाहिलं तर इंग्रजी विदेशी भाषा, त्यातल्या त्यात ज्यांनी आपल्या देशावर १५० वर्षे राज्य करून आपल्यावर अनन्वित अत्याचार केले त्या इंग्रजांची भाषा. ती इंग्रजी भाषा शिकवायला विरोध होत नाही. आणि हिंदी आपल्या देशातली, आपल्या समाजातली, संस्कृतीतली भाषा आहे. मराठी हिंदी लिपी एकसारखी आहे. अनेक शब्द एकसारखे आहेत. देशात १२१ महत्त्वाच्या भाषा असून, त्यापैकी संविधानातील ८ सूचीनुसार २२ अधिकृत भाषा आहेत. यातील हिंदी ही देशात सर्वाधिक ५७ टक्के बोलली जाणारी भाषा आहे. असे असताना त्याच हिंदी शिकवण्याला विरोध होत आहे. याचे आश्चर्य आहे. मग ज्या इंग्रजीचा आपला काहीही संबध नाही, जेथे इंग्रजीचा राग नाही तेथे हिंदीचा द्वेष का? या प्रश्नाचे उत्तर हिंदी द्वेष्ट्यांना द्यावेच लागेल.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारने पहिल्यांदाच महाराष्ट्राच्या इतिहासात पहिलीपासून राष्ट्रीय स्तरावरील दर्जेदार असा अभ्यासक्रम सुरू केला. केंद्रीय मंडळाच्या शाळांमध्ये जो अभ्यासक्रम शिकवला जातो त्याच धरतीवरील अभ्यासक्रम हा पहिल्यांदाच राज्यातील शाळांना सुरू झाला. ही महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासातील सगळ्यात ऐतिहासिक आणि महत्त्वाची घटना आहे. मात्र या घटनेकडे हिंदीच्या विषयावरून दुर्लक्ष केले जात आहे. पहिली ते पाचवीच्या वर्गाला तिसऱ्या भाषेचा पर्याय म्हणून शालेय शिक्षण विभागाने हिंदीसह इतर भाषेचा पर्याय दिला आहे. परंतु काही संघटना आणि तथाकथित विद्वानांनी तिसऱ्या भाषेच्या नावाखाली हिंदीला विरोध सुरू केला आहे. ज्याने विरोध केला आहे त्यांच्यातील बहुतांश मंडळींचा राज्य शिक्षण मंडळाच्या शाळांशी अथवा त्या अभ्यासक्रमाशी तसा कोणताही संबंध उरलेला नाही. त्यामुळे विरोध करण्यामध्ये त्यांची नैतिकता देखील नाही. परंतु स्वत:ला वेगळे दाखवण्याच्या नादामध्ये अनेकांनी विषय नीट समजून न घेता तृतीय भाषा हिंदीला विरोध सुरू केला आहे. मग राष्ट्रीय धोरणानुसार तिसरी भाषा म्हणून हिंदी द्यायची नाही तर मग कोणती भाषा द्यायची हे तरी विरोध करणाऱ्यांनी स्पष्ट करावे.

मागील चार दिवसांपूर्वी शालेय शिक्षण विभागाने हिंदी ही भाषा अनिवार्य नाही ती केवळ ऐच्छिक आहे असा स्पष्टपणे शासन निर्णय काढल्यानंतर देखील काही नेते समाजामध्ये गैरसमज पसरवून आपली राजकीय पोळी शेकण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. नसलेल्या विषयासाठी आंदोलनं सुरू झालेली आहेत. ज्याप्रमाणे सीएए कायद्याच्यावेळेस मुस्लिमांची नागरिकता हिसकावली जाईल असा गैरसमज पसरवून ज्या पद्धतीने रान पेटविले होते आणि त्यातून आपली मतपेटी सुरक्षित करण्याचा प्रयत्न केला गेला होता, नेमका तसाच हा प्रकार यावेळी विरोधकांचा चालला आहे. यावेळी हिंदीला विरोध करणाऱ्यांमध्ये सर्व यादी लक्षात घेतली तर त्या सर्वांचीच मुले अथवा नातवंडे मराठीच्या शाळेशी संबंधित नाही, किंबहुना कधीच संबंधित नव्हते. राज ठाकरेंची मुलं कुठं शिकली. कोणत्या मराठी शाळेत शिकली. जरा ठाकरेंनी महाराष्ट्रातील जनतेला सांगावं. मुलगा आणि मुलगी दोघेही स्कॉटिश ख्रिश्चन मिशनऱ्यांनी उभारलेल्या बॉम्बे स्कॉटिश स्कूल, या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकले. बरं आता नातवाचे नाव कोणत्या मराठी शाळेत टाकले आहे, राज ठाकरेंनी तेवढं तरी या महाराष्ट्राला सांगावे. त्यांचा तो व्यक्तिगत प्रश्न असला तरी कोणताही बदल घडवायचा असल्यास त्याची सुरुवात स्वतःपासून करावी लागते.

आपली राजकीय दुकानदारी चालविण्यासाठी नुसती महाराष्ट्राची डोकी भडकवायची. हा यांचा वडिलोपार्जित धंदा झाला आहे. विदर्भ, मराठवाड्याचा सीमावर्ती भाग हा तेलंगणा, आंध्रप्रदेशात होता. आजही येथे तेलुगू भाषिक लोक राहतात. गोंदिया जिल्ह्यात सर्वत्र हिंदी भाषेचं प्राबल्य आहे. येथे २०० हिंदी शाळा सुरू आहेत. मात्र, मुंबईशिवाय महाराष्ट्र आहे हे न कळलेल्यांना आणि मुंबई बाहेर कोणी विचारत नसलेल्या दरबारी राजकारण करणाऱ्यांना यातलं काय कळणार? बरं मुंबई बाहेरचं कळणार नाही हे जरी सत्य असलं तरी, मुंबई, ठाणे, पालघरमध्ये सर्वाधिक ९०० हिंदी भाषिक शाळा आहेत. ज्या मुंबईत मराठी शाळा एकेक करून बंद पडत आहेत, त्या मुंबईत हिंदी भाषिक शाळा दिमाखात सुरू आहेत. यासाठी राज ठाकरेंनी आपले बंधू उद्धवची २५ वर्षे महापालिकेवर सत्ता होती, त्याला काही सल्ला दिला कधी? नाही ना... मग कशाला उगाच उठाठेव करत आहात. काहीही केले तरी हाती काहीही लागणार नाही, ही काळ्या दगडावरची पांढरी रेष आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करून भारतातील एकूण शिक्षण पद्धतीमध्ये एक नव्या ऐतिहासिक पर्वाला सुरुवात केली आहे. हे पर्व भारताच्या भविष्यासाठी अत्यंत मूलगामी ठरणार आहे. याच पृष्ठभूमीवर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये पहिलीच्या वर्गापासून ते पदव्युत्तर आदी अभ्यासक्रमांमध्ये अध्ययन, अध्यापन पद्धती त्यासाठी एक गुणांकन आणि देण्यात येणारे क्रेडिट हे पहिलीच्या वर्गापासून महत्त्वाचे ठरणार आहेत. ही बाब समजण्याएवढी बुद्धिमत्ता राज्यातील हिंदी विरोधी मानसिकता असणाऱ्यांची नाही. पहिलीपासून विद्यार्थ्यांना इतर भाषेचे किमान ज्ञान अथवा त्यांनी तो विषय शिकला असल्यास त्याला एक विशिष्ट क्रेडिट दिले जाणार आहे आणि ते क्रेडिट त्याला पुढील आयुष्यभराच्या शिक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत. पण विद्यार्थिहिताचं इथं पडलं कुणाला आहे?

आमची मुलं बॉम्बे क्वॉटिशमध्ये शिकतील, विदेशात शिकतील, देशविदेशातल्या भाषा शिकतील. मात्र, सर्वसामान्यांच्या, गरिबाच्या मुलांनी साधं हिंदीदेखील शिकू नये? आजमितीला मराठी माणसाच्या प्रत्येक घरामध्ये हिंदी बोलताना ती परकी भाषा आहे, असं कधीच वाटत नाही. रोज हिंदी चित्रपट, मालिका पाहताना हिंदी ही वेगळी भाषा आहे, असे देखील आपल्याला कधी वाटत नाही. अशावेळी हिंदीचा विरोध करून काय सिद्ध करणार आहोत? भारताच्या कानाकोपऱ्यात कोणत्याही राज्यात गेल्यानंतर हिंदी आली तरच आपण संवाद साधू शकतो. इंग्रजीमुळे जगातील कोणत्याही देशात आपली अडचण होत नाही. फ्रेंच, जपानी आणि इतर अनेक भाषा राज्यातील अनेक इंग्रजी शाळांमध्ये शिकवल्या जातात.

आज महाराष्ट्राच्या कर्नाटक, गुजरात, मध्य प्रदेश आणि तेलंगणाच्या सीमेवरील असंख्य कुटुंबांमध्ये एकाच वेळी गुजराती, कन्नड, तेलुगू, हिंदी, उर्दू आणि मराठी अशा भाषा बोलल्या जातात. एकापेक्षा अधिक भाषा आल्याचा तेथील व्यक्तींना मोठ्या प्रमाणात फायदा होताना दिसत आहे. इतकेच काय राज्यातच अनेक समाजाच्या आपल्या भाषा असून, त्याही मराठीसोबत रोजच्या व्यवहारात बोलल्या जात आहेत. त्यामुळे मराठी माणसाला किंवा महाराष्ट्राला कुठला तोटा झाल्याचे कुठेही दिसून येत नाही. अशावेळी रोजच्या व्यवहारात मराठीप्रमाणेच सहजपणे बोलली जाणारी हिंदी मुलांनी पहिलीपासून शिकली तर त्यात गैर तरी काय?

९२७०३३३८८६

## वेध

**अनिल फेकरीकर**

# पूर्णब्रह्म अन्नातून विषबाधा का होते?


‘वदनि कवळ घेतां नाम घ्या श्रीहरीचे । सहज हवन होते नाम घेता फुकाचे । जीवन करि जिवित्वा अन्न हे पूर्ण ब्रह्म । उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म ॥ जय जय रघुवीर समर्थ’ असा श्लोक फार पूर्वी न चुकता आपले पूर्वज पंगतीत बसल्यावर भोजनापूर्वी म्हणायचे. समर्थ रामदास स्वामी यांनी लिहिलेला हा श्लोक भोजनाचे मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित करणारा आहे. अर्थात चांगला आहार आणि उत्कृष्ट व्यवहार हेच प्रगतीचे दोन आधार असतात. अन्न जीवन असून, तेच पूर्णब्रह्म मानले जाते. म्हणूनच की काय घरगुती अन्न निरोगी ठेवते, बाहेरचे भोजन दवाखान्यात नेते अशीही शिकवण आपल्याला पूर्वजांनी दिली. तरीही अनेकदा बाहेर हॉटेलमध्ये किंवा विवाह सोहळ्यात भोजन करण्याची वेळ येते. ते भोजन करण्यासाठी अनेक जण उत्सुकही असतात. अशाच उत्सुक लोकांना मात्र भोजनानंतर दवाखान्यात भरती व्हावे लागले अन् लग्न सोहळ्यातील भोजन विष झाल्याने त्यांचे दु:ख चव्हाट्यावर आले.

नागपूर जिल्ह्यातील भिवापूर गावात गुरुवार, १२ जूनला तिलक वाघमारे यांच्या घरी त्यांच्या मुलीचा विवाह सोहळा पार पडला. यावेळी लग्नात स्वयंपाकींनी तयार केलेले भोजन सेवन केल्याने १०० पेक्षा जास्त वऱ्हाड्यांना विषबाधा झाली. आपल्या वऱ्हाड्यांना असा त्रास व्हावा, असा कुठलाही उद्देश आयोजकांचा मुळीच नव्हता. त्यांनी तर पदरचा पैसा खर्च करून मुलीच्या लग्न सोहळ्यात आनंद द्विगुणित करण्यासाठी सर्व काही केले. पण कुठेतरी गडबड होऊन वऱ्हाड्यांना विषबाधा झाली. ही घटना केवळ चर्चा करण्यापुरती मर्यादित नाही, तर भविष्यात अशा घटना घडू नये यावर कुठेतरी लाभदायक उपाय प्रत्यक्ष अमलात आणण्याची गरज यातून अधोरेखित झाली आहे. बहुतांश प्रसंगांत दूध, दही आदींचा उपयोग करून तयार झालेल्या अन्नपदार्थांतून विषबाधा झाल्याचे समोर आले आहे. भिवापुरातील लग्न सोहळ्यात दहीवडे आणि गुलाबजाम कर्दनकाळ ठरले. कारण दहीवडे तयार करायचे झाल्यास उडदाची डाळ आदल्या दिवशी भिजवावी लागते. त्यानंतर त्यावर प्रक्रिया करून त्यांना दह्यात टाकतात. तापमान अधिक असेल आणि ते शिळे झाल्यास त्यातून सहज विषबाधा होते. याची जाणीव भोजन तयार करणाऱ्या स्वयंपाकींना असायला हवी. पण त्यांनीही दुर्लक्ष केले आणि भोजन तयार करून ते सर्व निघून गेले. इकडे तेच विषयुक्त भोजन वऱ्हाड्यांनी केले आणि त्यांना दुसऱ्या दिवशी रुग्णालयात भरती व्हावे लागले. एका क्षणात आनंद दु:खात परिवर्तित झाला. सुदैवाने यात अनुचित घटना घडली नाही, याला देवाचीच कृपा म्हणावी. अन्यथा फार मोठे अरिष्ट भिवापूरवर ओढवले असते. पण यापूर्वीही दुधापासून तयार झालेल्या अन्न पदार्थांतूनच विषबाधा झाल्याचे निष्पन्न झाले आहे. मग तरीही पनीरचीच भाजी, दुधाचेच पदार्थ, गुलाबजाम, दहीवड्यांचा आग्रह मेन्यू ठरविताना केला जातो, यावरही मंथन करायला हवे. सार्वजनिक सोहळा असेल तर नक्कीच कुठले पदार्थ तयार करावेत अन् कुठले नाही यावर बंधने यायला हवीत. त्याचा अभ्यास आहार क्षेत्रातील तज्ज्ञांनी करून तशी नियमावलीच लागू करायला हवी. आमचा पैसा आहे, तो आम्ही कसाही खर्च करू असे म्हणत काही मंडळी यावर आक्षेप घेतील. तेव्हा सरकारच्या अखत्यारीतील सार्वजनिक आरोग्य विभागाने ठणकावून सांगावे की, तुमच्या अन्नपदार्थांमुळे विषबाधा झाली तर संपूर्ण खर्च तुम्हाला वैयक्तिक पातळीवर करावा लागेल. त्यात आमची यंत्रणा विनाकारण भरडली जाणार नाही, जेव्हा केव्हा असा कठोर संदेश कृतीतून दिला जाईल, तेव्हा आपल्या घरचे अन्न सात्त्विक आणि शुद्ध राहील याची काळजी प्रत्येक जण घेईल. गरीब, श्रीमंत आपापल्या परीने पैसा खर्च करतात. मग ज्यामुळे लोकांचा जीव जाऊ शकतो, ते अन्नपदार्थ विषयुक्त नसावेत याची काळजी घेण्याची जबाबदारी कोणाची? हेही ठणकावून सांगण्याची गरज आहे. लग्नावर वारेमाप खर्च केला जातो. पण भोजनाच्या संदर्भात दुर्लक्षच केले जाते. स्वयंपाकी तर केवळ पैसे कमवायलाच बसले आहेत. त्यांनीही आपल्या भोजनातून कुणाला विषबाधा होणार नाही, याची काळजी घ्यायला हवी. लग्नघरी गडबड असते. त्याचाच गैरफायदा अनेक जण घेतात. त्यावर आळा घालण्यासाठी पूर्वी शहाण्या माणसांची मदत घेतली जायची. तीच पद्धत पुन्हा अस्तित्वात यावी. शेवटी, स्वच्छ, सात्त्विक, विषमुक्त अन्न, आपल्या आरोग्याचा खजिना आहे, हे कदापि विसरू नका. समजा हा फॉर्म्युला जो विसरला तो नक्कीच दवाखान्यात पोहोचला, हे समजून घ्या.

९८८१७१७८५९

### योग यथाशक्ती निरंतर

आज २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून संपूर्ण जगात साजरा होत आहे. भारतीय संस्कृतीने जगाला दिलेल्या अनेक देणग्यांपैकी ही एक बहुमोल देणगी असून त्याचे आता महत्त्व पटू लागले आहे. शारीरिक स्वास्थ्य उत्तम राखण्यासाठी अनेक प्रकार, क्रिया उपलब्ध असले तरी शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य यासाठी योग हेच परिणामकारक आहे. इतर क्रिया (खेळ प्रकार) मध्ये चंचलतेवर नियंत्रण राहत नाही. किंबहुना ते वाढीस लागते. मात्र यामध्ये सुद्धा योगाचा अंतर्भाव केल्यामुळे त्यांच्या कार्यक्षमतेवर सकारात्मक परिणाम होत आहेत. योगशास्त्रात पंच ज्ञानेंद्रिये व पंच कर्मेंद्रिये यांच्या हालचालींना शास्त्रीय क्रमबद्धतापूर्वक वळण लावून विविध आसन मुद्रा तयार केल्या आहेत. यांच्या सरावाने आळस कमी होतो, मनाचीअस्वस्थता कमी होऊन ते स्थिर मार्गी होते त्यामुळे मन-शरीर प्रफुल्लित राहून आनंद निर्माण होतो.



नागपूर शहराचे भूषण, योगमूर्ती प. पू. जनार्दन स्वामी महाराज यांनी योगाभ्यासी मंडळाची स्थापना करून योगशास्त्राचे संवर्धन व प्रवर्धन करून यास जगमान्यता मिळवून दिली आहे. ऋषी पतंजली कृत अष्टांगयोगात आसन या शारीरिक क्रियेस अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रत्येकाचे शरीर हे बाह्य स्वरूपी समान असते. आंतरिक रचना विविधतेची असल्याने दिनचर्या शारीरिक क्रियेत होणाऱ्या हालचालींना क्रमबद्ध रीतीने एकत्रित करून विविध आसन आकृती तयार केल्या आहेत. त्या केल्यामुळे संपूर्ण शरीरात लवचीकता निर्माण होते, रक्ताभिसरण जोमाने होऊन, प्राणवायूचे प्रमाण वाढल्याने शरीरातील विष द्रव्ये मल, मूत्र, घाम व मळ रूपाने बाहेर पडल्याने आंतरिक सर्व अवयव शुद्ध होतात. या शास्त्रात परमात्म्याशी एकरूपता साधण्यासाठी पद्मासन या आसनास अत्यंत महत्त्व आहे. चंचल मनावर नियंत्रण मिळविण्यासाठी या क्रियेचा लाभ होतो. ध्यान क्रियेत आसनाच्या सरावाने षड चक्र उद्दीपित होऊन समाधी अवस्था प्राप्त होते असा साधकांचा अनुभव आहे. आपल्या भारत भूमीची ही पवित्र ठेव जपणे, त्याचे संरक्षण, संवर्धन व प्रचार-प्रसारासाठी यथाशक्ती निरंतर कटिबद्ध होणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे आणि हाच प्रात:स्मरणीय, योगमूर्ती जनार्दन स्वामी यांचा आशीर्वाद आहे.

**संजय पाठक**/९४२२१४७६७७

## वाचक पत्रे

### भ्रष्टाचाराचे धनी होऊ नका

भारतात चारा घोटाळा, शवपेटी विकत घेण्यात भ्रष्टाचार झाला. भ्रष्टाचाऱ्यांनी कोट्यवधी रुपये खाल्ले आणि घोटाळ्यात आरोपी म्हणून सिद्ध झाल्यानंतर जेलमध्ये गेले. काही आई-वडील लहान मुलांना सांगतात की, परीक्षेत पास हो. तुला एखादी वस्तू विकत घेऊन देईन. मला वाटतं हा भ्रष्टाचाराचा पाया आहे. भ्रष्टाचारामुळे लोक श्रीमंत होतात. समाजात त्यांना मान मिळतो. त्यांची पत्नी लायकी नसताना कुठेतरी उच्च पद भूषवते. मुले बापाच्या पैशावर उन्मत्त होतात. बेदरकारपणे वाहन चालवितात, लोकांचा जीव घेतात व अमाप पैशामुळे निरपराधी सिद्ध होतात. एकदा नारदाने वाल्या कोळीला म्हटले, तू लूटमार करून तुझे कुटुंब पोसतो. लूटमार पाप आहे. त्यांत तुझे कुटुंब सहभागी आहे काय? सर्वांनी नकार दिला. तसेच भ्रष्टाचारी व्यक्तीला जेलची हवा खावी लागते. त्याचे पद जाते. समाजात नाचक्की होते. खूपदा कुटुंबातील व्यक्ती म्हणतात, तुम्हाला भ्रष्टाचार करायला आम्ही सांगितले नाही. खूपदा तुमची संपत्ती सरकारजमा होऊन कुटुंब रस्त्यावर येते. तुमचे नाव घेताना त्यांना लाज वाटते. म्हणूनच वाम मार्गाने पैसे कमवून भ्रष्टाचाराचे धनी होऊ नका, जेलची हवा खाऊ नका, कुटुंबाला लाज वाटेल असे वागू नका. या जगात कुणीच कुणाचे नाही हेच खरे.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

### साहित्यप्रेमी मारुती चितमपल्ली

अरण्यऋषी, पद्मश्री पक्षितज्ज्ञ मारुती चितमपल्ली यांचे नुकतेच सोलापुरात निधन झाले. चितमपल्ली यांच्याशी, ते नागपुरात असताना ओळख करून दिली ती आमचे चळवळे व अतिउत्साही मित्र तरुण भारताचे चंद्रकांत ऊर्फ नाना कुळकर्णी यांनी. त्यांच्या टिळकनगरातल्या बंगल्यासमोर चितमपल्ली राहायला आले होते. आम्हाला मराठी विज्ञान परिषदेतर्फे त्यांचा एक कार्यक्रम घ्यायचा होता. त्यासाठी त्यांच्या कार्यालयामध्ये जाऊन भेटलो होतो. चितमपल्लींशी ही ओळख पुढे वाढत गेली. तेव्हा त्यांचे ‘पक्षी जाय दिगंतरा’ नुकतेच आले होते व त्यावर मला ‘माग्रस’च्या कार्यक्रमात बोलायचे होते. माग्रस या (माझा ग्रंथ संग्रह) वाचक चळवळीचे प्रणेते सुधीर देव हे अनेक कल्पक वाङ्मयीन स्नेहभेटींचे दर महिन्यात आयोजन करायचे. एका वार्षिक स्नेहभेटीत अभियंता नंदा खरे यांच्या घरी लेखकाच्या उपस्थितीत समग्र चितमपल्ली या विषयावर दीर्घ सादरीकरण केले होते. एका स्नेहभेटीसाठी हैदराबादहून मुद्दाम आलेले मराठी साहित्य परिषदेचे द. पां. जोशी यांनी या कार्यक्रमावर ‘माझिया जातीचे भेटो मज कोणी’ हा एक सुंदर लेख लिहिला होता. चितमपल्ली यांची अनेक पुस्तके साहित्य प्रसारच्या राजाभाऊ कुळकर्णी यांनी अतिशय देखण्या रूपात काढली होती. निवृत्तीनंतर मारुती चितमपल्ली नागपुरात लक्ष्मीनगरला राहायला आले होते. पण ते शहरात रमले नाहीत. पवनी (नवेगाव बांध) चे निसर्गप्रेमी कै. माधवराव पाटील यांच्याशी त्यांचा विशेष स्नेह होता. पवनीच्या टेकडीवर वन्य प्राणी-पक्षी यांच्या पाण्यासाठी माधवराव पाटलांनी एक पाणवठा बांधला आहे. त्यावर त्यांनी चितमपल्ली यांचे नाव कोरले आहे. त्यांच्याशी ओळख होणे, त्यांचा स्नेह मिळणे हे पूर्वजन्मीचे सुकृत आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**विश्वेश्वर सावदेकर**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# हिंगोलीत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

## स्वत: सह निरोगी धरतीसाठी योग करा- आ. तान्हाजी मुटकुळे, लोकप्रतिनिधी, अधिकारी यांनी केला योग











**तभा वृत्तसेवा**
**हिं[illegible]२१ जून**

ये[illegible]ंत नामदेव पोलीस कवायत मैदानावर आयोजित अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन, क्रीडा विभाग, शिक्षण विभाग, योग विद्याधाम, पतंजली योग समिती, हरिओम योगा ग्रुप, विविध सामाजिक संस्था, मंडळे यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी आमदार तानाजी मुटकुळे, माजी खासदार शिवाजीराव माने, पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर, जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश्वर मारावार, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, योग शिक्षक रत्नाकर महाजन, विठ्ठल सोळंके, ज्योती शेळके आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी श्री. गुप्ता म्हणाले, आज दि. २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा केला जातो. माणसाला निरोगी राहण्यासाठी योग हा प्रत्येक घरापर्यंत पोहोचला पाहिजे, असे सांगून सर्वांना आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

आज संपूर्ण जगभर हा दिन साजरा केला जात आहे. याचे सर्व श्रेय भारत देशाला, देशाच्या प्रधानमंत्र्यांना आहे. योग हा आपल्या जीवनातला अविभाज्य भाग आहे. त्यामुळे सर्वांनी दररोज योग करुन निरोगी रहावे, असे सांगून आमदार तानाजी मुटकुळे यांनी सर्वांना योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच यावेळी माजी खासदार शिवाजीराव माने, पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनीही दररोज योग करणे आवश्यक असल्याचे सांगून योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

योगगुरु रत्नाकर महाजन व विठ्ठल सोळंके यांनी योग दिनामध्ये सहभागी झालेल्या प्रत्येकाने आपले मित्र व कुटुंबीयांना योगाचे महत्त्व समजावून सांगावे. तसेच योगाचा प्रसार करण्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे, असे आवाहन केले. तसेच योग दिनानिमित्त त्यांनी उपस्थितांकडून योगविद्येची विविध आसने करुन घेतली. योगाची शपथ तसेच प्रार्थना आणि संकल्प करत, शांती पठनाने योग दिनाची सांगता झाली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन योग शिबिराचा प्रारंभ करण्यात आला. या शिबिरास विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, योगाभ्यासी मंडळाचे सदस्य, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलतांना आ. मुटकुळे म्हणाले की, एक पृथ्वी, एक स्वास्थ हा यावर्षीच्या जागतिक योग दिनाचा सार्वत्रिक बोलण्याचा विषय म्हणजेच थीम असून स्वतः सोबतच धरतीच्या निकोप आरोग्यासाठी देखील योग करून योग दिनाची थीम अंमलात आणावी असे प्रतिपादन हिंगोली विधानसभेचे सदस्य आमदार तानाजी मुटकुळे यांनी केले.

जिल्हा प्रशासनातील क्रीडा विभाग, शिक्षण विभाग, पोलीस प्रशासन, राज्य राखीव दल, नगर परिषद, पतंजली योग समिती,हरी ओम योगा ग्रुप, नाशिक योग विद्या धाम, हार्टफुलनेस, पतंजलीच्या राजकुमार टिळे, प्रणत अग्रवाल, शितल तापडिया आदींच्या प्रमुख उपस्थितीमध्ये दीपप्रज्वलनाने शिबिराची सुरुवात झाली. पतंजलीचे प्रमुख योग मार्गदर्शक कुंडलिक निर्मले, विठ्ठल सोळंके, माधुरी शास्त्री ज्योती वाघमारे, नाशिक योग विद्याधामचे रत्नाकर महाजन आदींनी उपस्थितांना योग मार्गदर्शन करत सामान्य योगा प्रोटोकॉल नुसार चालन क्रिया, योगासने प्राणायाम, ध्यान करून घेतले. राष्ट्रीय पातळीवरील युवा योगासन पटू नकुल डांगे व शहाजी देशमुख यांनी अवघड आसनांचे प्रात्यक्षिक करून दाखवले. शहरातील शाळा महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांसह, राज्य राखीव दलाचे जवान, पतंजलीचे योग साधक व शहरातील योग प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. शिबिर आयोजन नियोजनासह क्रीडा विभागाचे सहाय्यक क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर, नगर परिषदेचे बाळासाहेब बांगर क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर, नगर परिषदेचे बाळासाहेब बांगर, पतंजलीचे उमेश तोष्णीवाल,अशोक पवार, बालासाहेब हरण, एकनाथ बांगर, पंडित गुट्टे, बाबुराव पारस्कर, बाबाराव पवार आदींनी परिश्रम घेतले.

# रूग्णालयातील नर्सींग वसतीगृहात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जून**

येथील जिल्हा रुग्णालयातील नर्सिंग वसतिगृहात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस यांच्या मार्गदर्शनाखाली आज अकरावा आंतरराष्ट्रीय योगा दिन साजरा करण्यात आला.

या योग दिनाची ''योगा फॉर वन अर्थ वन हेल्थ (एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग)'' अशी संकल्पना ठेवण्यात आलेली होती. या योग दिनाचे उद्घाटन अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक तथा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. दीपक मोरे यांच्या हस्ते धन्वंतरीच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करुन करण्यात आले. योगाचे प्रशिक्षक डॉ. राधा नगरे व संतोष वानखेडे यांनी उपस्थित विद्यार्थी, अधिकारी यांच्याकडून योगासने व प्राणायाम करुन घेत मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य कुलदीप कांबळे, मेट्रन आशा क्षीरसागर, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. विद्या देवकते, डॉ. संजय देशमुख, डॉ. सोनी अग्रवाल, डॉ. रहेमतुल्ला खान, डॉ. अझहर देशमुख, सुनिल जाधव, सोपान वानखेडे, प्रकाश ठाकरे, राजू बसिया, सुरेश चिटकरे, स्वाती वरखडकर व नर्सिंग वसतिगृहातील विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी डॉ. मोरे यांनी उपस्थितांना योगा दिनाचे महत्व सांगून योगाभ्यास दररोज करावा, असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अधिकारी, कर्मचारी व नर्सिंग वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



**हिंगोली- शहरातील एनटीसी परिसरात नगर परिषदेच्यावतीने रोपवाटीका तयार करण्यात आली असून यामध्ये सुमारे ८० हजार रोपे तयार करण्यात आली आहेत. शनिवारी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी रोपवाटीकेची तसेच खत निर्मिती प्रकल्पाची पाहणी केल्यानंतर कौतुक केले. यावेळी मुख्याधिकारी अरविंद मुंढे, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, चंद्रकांत लव्हाळे यांची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

# शहरातील विविध शाळांमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा









**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जून**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शहरातील विविध शाळांमध्ये पतंजली योग समिती तसेच योग शिक्षक यांच्यावतीने योग शिबीराचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात योग शिबीरात सहभाग नोंदवला.

शहरातील भारतीय विद्यामंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय हिंगोली येथे आज २१ जून हा योग दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यालयातील अध्यापिका जागृती गोरे यांनी योगासनाचे जीवनातील महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. तसेच योगरत्न डॉ. माधुरी शास्त्री यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना योगशास्त्र बद्दल माहिती सांगितली. यानंतर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष योगासनाचे धडे देण्यात आले. प्रात्यक्षिके करून घेण्यात आली. एस एच तपोवनकर, शारदा लेकुळे व पूजा चौरसिया यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना योगासने करताना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात शाळेची शिस्त सांभाळण्याचे काम अनिल लोळेवार व सर्व अध्यापकांनी केले.कार्यक्रमाचे संचलन संजय कुलकर्णी यांनी केले. एकूण कार्यक्रम उपमुख्याध्यापक जितेंद्र भट्ट यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. सर्व विद्यार्थ्यांना व शिक्षकांना मुख्याध्यापक डॉ. प्रकाश अंभोरे यांनी योग दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. हिंगोली तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राहोली खुर्द येथे आंतरराष्ट्रीय योगा डे उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला होता.या वेळी विद्यार्थ्यांना अभिनंदन घोंगडे यांनी योगा डे चे धडे दिले. तर मुख्याध्यापक श्री.गजानन बोरकर यांनी योगाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. आरोग्य चांगले राहण्यासाठी नियमित योगा करावेत. त्यामुळे माणूस निरोगी आणि सुदृढ राहतो असेही आवर्जून सांगितले.योगा डे संचलन सौ.सिंधूताई दहिफळेयांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुधाकर जाधव, सौ. उज्ज्वला नर्सिकर, सौ.क्रांती काळे, सौ.लता राठोड यांनी परिश्रम घेतले.

यावेळी राहोली खुर्द चे सरपंच सचिन गरड, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष रमेश गरड, भास्कर बाहत्तरे, शामराव फुंडसे, अभिषेक खिल्लारे आणि मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

शहरातील अॅड ग्यानबारावजी शिरसाट संस्थेच्या राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन शाळेत राष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक बल्लाळ, प्राचार्य शेळके, डोल्हारे, पर्यवेक्षक कान्हेड उपस्थित होते. याप्रसंगी योग शिक्षिका सायली जगताप यांनी विद्यार्थ्यांना योग प्रशिक्षणाचे धडे दिले. कार्यक्रमाची सुरुवात सूक्ष्म व्यायामाने करून नंतर विविध योगासने, प्राणायाम, ध्यान, सूर्य नमस्कार यांचे प्रात्यक्षिक करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून देऊन योग हा आपल्या जीवनातील तणाव कमी करून मनशांती मिळवण्यासाठी उपयुक्त आहे याचे महत्व सांगण्यात आले. संस्थेकडून विद्यार्थी आणि शिक्षक यांना योग दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कान्हेड, वाबळे, ठोके, टेकाळे, पडघन, पाईकराव, मेटकर आणि चाटसे यांचे सहकार्य लाभले. तसेच सेवक इम्रान आणि सेविका नरवाडे ताई यांची सुद्धा मदत झाली.

दयानंद एज्युकेशन सोसायटी हिंगोली द्वारा संचलित सरजुदेवी भिकुलाल भारुका आर्य कन्या माध्यमिक विद्यालय येथे योगा डे उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी योग शिक्षिका योग रत्न माधुरी शास्त्री व पूजा चौरसिया तसेच विद्यालयाच्या प्रभारी मुख्याध्यापिका एम एस गुंडेकर उप मुख्याध्यापक यु के युरेकार, विपुल भारुका चंद्रकांत वेदालंकार, सर्वप्रथम विद्यार्थिनींना योगा बाबत मार्गदर्शन करण्यात आले त्यानंतर योगाचे सर्व प्रकार श्रीमती माधुरीताई शास्त्री श्रीमती पूजा चौरसिया. योगाचे विविध प्रकार करून दाखविले. या कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष ओमप्रकाश भारुका, संस्थेचे सचिव अनिलकुमार भारुका यांनी या कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमासाठी शिक्षक शिक्षिका, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### १ ते ८ जुलै कालावधीत नोंदणी व मुद्रांक विभागातील शिपाई पदांच्या परीक्षा

हिंगोली- नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाई 'गट-ड' संवर्गात २८४ पदे भरती करीता दि. २२ एप्रिल, २०२५ रोजी सदर भरती प्रक्रिया पूर्ण करण्याकामी ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारणे, तसेच ऑनलाईन पध्दतीने परीक्षेचे आयोजन करण्याकरिता आय.बी.पी.एस. (इंस्टीट्यूट ऑफ बँकीग पर्सोनेल सिलेक्शन) कंपनीस नियुक्त केले आहे व त्यानुसार आय.बी.पी.एस. कडून दि. २२ एप्रिल २०२५ ते १६ मे २०२५ दरम्यान ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरुन घेण्यात आलेले आहेत. आय.बी.पी.एस.च्या संकेतस्थळावर यशस्वीरीत्या भरलेले अर्ज व पात्र असलेल्या उमेदवारांची दि. ०१ जुलै २०२५ ते ८ जुलै २०२५ या कालावधीत्त ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेचे प्रवेशपत्र/हॉलतिकीट उमेदवारास त्यांनी नोंदणी केलेल्या ई-मेलवर आय.बी.पी.एस. कडून पाठविण्यात येणार आहे. या परीक्षेकरीता विभागाकडून कोणत्याही इतर एजन्सीची वा मध्यस्थाची नेमणूक करण्यात आलेली नाही. जर याबाबत कोणती व्यक्ती, संस्थेकडून, मध्यस्थ अथवा तशी बतावणी करण्यात येत असल्यास अशा व्यक्ती वा संस्थेपासून उमेदवारांनी कृपया सावध राहावे, असे आवाहन नोंदणी व मुद्रांक विभागातर्फे सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी एस.जी. सुंकवाड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# गोदावरी कृषी केंद्राला कृषी विभागाकडून सील, आरोपी फरार



**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २१ जून**

शहरातील गोदावरी कृषी केंद्राला कृषी विभाग आणि पोलिसांच्या पथकाने दि २० जून रोजी पाहणी केली. खताच्या नोंदीमध्ये अनियमितता तसेच साठा नोंदवही व प्रत्यक्ष साठ्यामध्ये असलेल्या तफावतीमुळे पथकाने केंद्राला सील केले आहे. आरोपी मात्र अद्याप फरार असून पोलिस तपास करीत आहे.

या तपासणीमध्ये ५० पोते युरीया खताचे बिल सादर करता आले नाही शिवाय सदर खत कोठून खरेदी केले याची माहीती विक्रेत्याला देता आली नव्हती तसेच या खताच्या नोंदीदेखील केंद्र चालकाकडे नसल्याचे स्पष्ट झाले. गोदामात खताचा उपलब्ध साठा व साठा वहीतील नोंदी याची तपासणी केली असता त्यात तफावत आढळून आली आहे. यावेळी पोनि शाम डोंगरे, कृषी विभागाचे अतुल वायसे, पुंडगे, पाचपुते, गाडे यांची उपस्थिती होती.

# महिलेवर अत्याचार करून पतीला ठार मारण्याची धमकी, गुन्हा दाखल

**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २१ जून**

हिंगोलीग्रामीणपोलिसठाण्यांतर्गत एका गावात महिलेवर अत्याचार करून तिच्या पतीलाच जीवे मारण्याची धमकी देऊन तिच्या मुलीचा विनयभंग करणाऱ्या एका तरूणावर शनिवारी पहाटे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपीच्या शोधात पोलिसांचे पथक रवाना झाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत एका गावात विकास गिरी या तरूणाने एका महिलेवर अत्याचार केला. मात्र बदनामीच्या भितीने तिने हा प्रकार कोणालाही सांगितला नाही. त्यामुळे विकास हा मागील काही दिवसांपासून तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार करीत होता.

दरम्यान शुक्रवार दि २० जून रोजी त्याने पुन्हा एकदा महिलेच्या घरात जाऊन तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केला. या प्रकाराची माहीती त्या महिलेच्या पतीला मिळाल्यानंतर त्याने विकास याला जाब विचारला. मात्र पतीलाच जीवे मारण्याची धमकी देऊन शांत केले. या प्रकारामुळे घाबरलेल्या महिलेची मुलगी तेथे आल्यानतंतर विकास याने त्या मुलीचाही विनयभंग करून पळ काढला. या प्रकारानंतर त्या महिलेने कुटुंबियासह थेट हिंगोली ग्रामीण पोलिस ठाणे गाठून रितसर तक्रार दाखल केली.

यामध्ये विकास याने मागील एक वर्षापासून जबरदस्तीने अत्याचार केला असून पतीलाही जीवे मारण्याची धमकी दिली तसेच मुलीचा विनयभंग केल्याचे तक्रारीत नमुद केले आहे. यावरून विकास गिरी या तरूणाविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस निरीक्षक शाम डोंगरे. उपनिरीक्षक श्रीदेवी वग्गे, उपनिरीक्षक राहुल गिते यांच्या पथकाने घटनास्थळी भेट दिली आहे. याप्रकणात आरोपीच्या अटकेसाठी पोलिसांचे पथक रवाना झाले आहे.

# जागतिक योग दिनानिमित्त भाजपा जालना महानगर आणि योग भूमी परिवारातर्फे सामूहिक योगाभ्यास

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जागतिक योग दिनाच्या निमित्ताने आज दिनांक २१ जून २०२५ रोजी भारतीय जनता पार्टी जालना महानगर व योग भूमी परिवार जालना यांच्या संयुक्त विद्यमाने एक भव्य योग शिबीराचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम सकाळी ५.०० ते ७.०० या वेळेत ज्वाला लॉन्स, गुरुबच्चन चौक, महेश भवन समोर, जालना येथे उत्साहात संपन्न झाला.

यावेळी योग भूमी परिवाराचे योग शिक्षक श्री.डागा सर व त्यांचे सर्व प्रमुख पदाधिकारी, स्वयंसेवक सह भाजपाचे राजेश राऊत, रामेश्वर भांदरगे, विजय कामड, बाबुराव भवर, सखुबाई पणबिसरे, ममता कोंड्याल, अमोल धानुरे सतीश केळकर, गोवर्धन कोल्हे, सिद्धिविनायक मुळे, डोंगरसिंग साबळे, सिद्धेश्वर हाजबे, सतीश अकोलकर, सुदर्शन काळे, सचिन मोहता, रणजीत रीडला, गोविंद ढेंबरे, निलेश गवळी, शाम उगले, तुकाराम बखळे, संजय माधवले, इत्यादीसह पदाधिकारी व



कार्यकर्ते उपस्थित होते. हा कार्यक्रम भारतीय जनता पार्टी जालना महानगरचे जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली व योग शिक्षक श्री. डागा सर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमात विविध वयोगटातील शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. प्रशिक्षित योग शिक्षिकांच्या मार्गदर्शनाखाली विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणा करण्यात आली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आणि पुढाकाराने २०१५ पासून २१ जून हा 'जागतिक योग दिन' म्हणून संपूर्ण जगभर साजरा केला जातो. भारताच्या प्राचीन योग परंपरेचा जागतिक स्तरावर प्रचार व प्रसार व्हावा यासाठी त्यांनी संयुक्त राष्ट्र संघात मांडलेला प्रस्ताव ऐतिहासिक ठरला होता. या उपक्रमाची प्रेरणा घेऊन जालन्यातील नागरिकांनीही या दिवशी योगाभ्यास करून आरोग्यपूर्ण जीवनशैलीचा संदेश दिला. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगभूमी परिवाराचे सर्व पदाधिकारी, स्वयंसेवक तसेच भाजपाचे देविदास देशमुख, सुनील पवार यांनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त

### जालना-शिर्डी पायी पदयात्रेला उत्साहात सुरुवात

#### शिवसेना शहरप्रमुख विष्णू भाऊ पाचफुले यांच्या हस्ते पदयात्रेचे स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना येथून शिर्डीकडे निघालेल्या पायी पदयात्रेचा शुभारंभ मोठ्या उत्साहात झाला. या पदयात्रेचे स्वागत शिवसेनेचे शहरप्रमुख विष्णू भाऊ पाचफुले यांच्या हस्ते करण्यात आले.

ही पदयात्रा जालना-बदनापूर-संभाजीनगर मार्गे शिर्डीकडे प्रस्थान करत असून, किरण कांबळे, गणेश कुलकर्णी, आकाश गायकवाड, रोहित बोर्डे यांच्यासह अनेक भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. यावेळी उपस्थित मान्यवरांमध्ये शिवसेना शहरप्रमुख विष्णू भाऊ पाचफुले,

शेख नजीर भाई, मेघराज भैया चौधरी, सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे, कुशाल मडावी, पांडुरंग खैरे, सोपान कावले, वैजनाथ कावले, आजर शेख, आयुष राठोड आदी मान्यवरांनी पदयात्रेला शुभेच्छा देत रवाना केले.

### तहसीलदार यांना शेतात नाल्याचे पाणी थांबत असल्याने दिले निवेदन



#### पावसाचे पाणी थांबून होत आहे शेतीचे नुकसान : शेतकऱ्यावर उपासमारीची वेळ

**तभा वृत्तसेवा**
**शहागड/प्रतिनिधी**

पैठण तालुक्यातील दादेगाव येथिल हार्षी ते दादेगाव येणाऱ्या नाल्यावरील पाणी वाहून जाणारा पूल मातीने व मुरुमाने बुजवून- दाबून शेतात पाणी काढून दिल्याने पाण्याचा बंदोबस्त करण्यासाठी तहसीलदार तहसील कार्यालय पैठण यांना शेतकरी

दत्तात्रय शेषराव हजारे रा. दादेगाव 'बु' ता. पैठण, जि.छ. संभाजीनगर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की दादेगाव बु. येथील मालकीच्या असलेल्या शेत गट.न. क. ६२ मध्ये एकूण क्षेत्र ३८ आर. क्षेत्र असून शेता जवळच हार्षी ते दादगाव असा पाणी वाहून घेऊन जाणारा नाला आहे. या नाल्यावर केंद्र सरकार ने बनवलेला पूल असून रोडच्या पलीकडे शेतकरी अनिल प्रल्हाद हजारे रा, दादेगाव बु. यांनी माझ्या कडील पुलावरील नाल्याचा पूर्ण भाग हा मुरुम व मातीने बुजवून-दाबून माझ्या शेतात पाणी काढून दिले आहे. तसेच दादेगाव बु. येतील अटल बिहारी वाजपेयी ग्राम सडक योजनेच्या रस्त्यावरील बनवण्यात आलेला पूल सुद्धा दाबण्यात आलेला आहे, या नाल्याच्या पाण्यामुळे माझ्या शेतातील पिकांचे पूर्णपणे नुकसान होत असून शेतात मोसंबी, कापूस,तुर लावलेली असल्याने नुकसान होत आहे. नुकसानामुळे माझ्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येणार आसल्याने तहसीलदार यांनी दक्षता घेऊन नाला मोकळा करून देण्याची मागणी निवेदनाद्वारे शेतकऱ्यांने तहसीलदार यांच्या कडे केलेली असून न्याय देण्याची मागणी करण्यात आलेली आहे.

## शिक्षक वर्गातच विद्यार्थ्यांसमोर पायवर करुन गाढ झोपला

### गाडेगव्हाण येथील जिल्हा परिषद शाळेतील प्रकार

### व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

जाफराबाद तालुक्यांतील गाडेगव्हाण येथील जिल्हा परिषद शाळेतील एक शिक्षक व्ही.के.मुंडे हे वर्गातच विद्यार्थ्यांसमोर पाय वर करुन गाढ झोपल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. गाडेगव्हाण येथील जिल्हा परिषद शाळेत वर्ग पहिली ते चौथीपर्यंत आहे ५३ ही विद्यार्थी संख्या आहे व तिथे दोन शिक्षक कार्यरत आहे.दोन्ही शिक्षक शाळेत उपस्थित होते. शैक्षणिक वर्षाला नुकतीच सुरुवात झाली आहे. त्यातच



व्हिडिओ गाडेगव्हाण येथील जिल्हा परिषद शाळेतून समोर आला आहे. या झालेल्या प्रकारा विषयी गटशिक्षण अधिकारी डॉ. सतीश शिंदे यांना संपर्क केला असता चौकशी अहवाल तयार करून कारवाई करू असे त्यांनी सांगितले

## जुईधरण ते वालसांवगी फाटा रस्त्याच्या कामाला रावसाहेब दानवे यांची अचानक भेट

### कंत्राटदार व अधिकाऱ्यांना कामात गुणवत्ता ठेवण्याचा कडक सुचना
### विदर्भ, खान्देश व मराठवाड्याला जोडल्या जाणारा महत्त्वपूर्ण रस्ता

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील सर्व बाजुने महत्त्वाचा समजल्या जाणाऱ्या जुईधरण ते वालसांवगी फाटा रस्त्याचा कामाला माजी मंत्री रावसाहेब दानवे यांनी रविवारी अचानक भेट देऊन कामाची पाहणी केली.तसेच संबंधित गुत्तेदार व अधिकाऱ्यांना कामात गुणवत्ता ठेवण्याच्या कडक सुचना यावेळी दिल्यात.दानवे यांनी अचानक येऊन रस्त्याच्या कामाची पाहणी केल्याने अधिकारी व गुत्तेदाराची यावेळी चांगलीच धावपळ उडाली.यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष राजेद्र देशमुख,सांडु वाघ,कडुबा देशमुख, बाबु बेराड, आदीची यावेळी उपस्थिती होती,सदर रस्त्याचे काम १७८ कोटी रुपये खर्च करुन पूर्ण करण्यात येणार आहे.जागतिक बँकेशी करार करीत या रस्त्याचे काम पूर्ण होणार असल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.शिवाय विदर्भ,खान्देश व मराठवाडा आदी भागाला जोडल्या जाणारा हा महत्त्वपूर्ण रस्ता आहे.

जुईधरण ते वालसांवगी फाटा या डाबरीकरण रस्त्याची मोठी दुरावस्था झाली होती.

या रस्त्यावर जागोजागी मोठाले खड्डे पडलेले होते.त्यामुळे उत्तर भागातील नागरिकांना प्रशासकीय तसेच ईतर कामासाठी तालुक्याच्या ठिकाणी जायचे झाल्यास खड्यांचा प्रचंड त्रास सहन करीत भोकरदन गाठावे लागत असे.याबाबत वेळोवेळी प्रशासनाकडे पाठपुरावा देखील करण्यात आला.मात्र त्याची दखल कधीही घेतल्या गेली नाही.अखेर शेवटी या भागातील नागरिकांनी आमदार संतोष दानवे यांच्याकडे आपल्या व्यथा आणि यातना व्यक्त केल्या.या अनुषंगाने आमदार संतोष दानवे वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करीत सदर रस्त्यासाठी हॅबरीड हॅनिव्हेटी योजनेतुन जागतीक बँकेशी करार करीत १७८ कोटी रुपये मंजुर करुन घेतले.मागील ८ महिन्यापासुन या रस्त्यावर युद्धपातळीवर सुरूवात करण्यात आली आहे.पुर्वी हा रस्ता डांबरीकरणाचा होता.आता हा रस्ता काँक्रीटीकरणाचा होत आहे.विशेष म्हणजे या रस्त्याचे बर्याच वर्षानंतर भाग्य उजाळले असल्याने विदर्भ,खान्देश व मराठवाड्यातील तसेच या भागातील जवळजवळ ६० गावातील नागरिकांचा खडतर रस्ता सुकर होण्यास मदत होणार आहे.कारण या रस्त्यावर नेहमीच वाहनांची मोठी वर्दळ असते.रविवारी मंत्री रावसाहेब दानवे यांनी रस्त्याच्या कामाला भेट देऊन अधिकारी व गुत्तेदाराला कामात गुणवत्ता ठेवण्याचा कडक सुचना दिल्या आहेत.

## मंगळवारी सर्वाइकल कॅन्सर प्रतिबंधक लसीकरण अभियान

### २३ जूनपर्यंत संमतीपत्र भरून द्यावे -जयश्री लड्ढा

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**




लायन्स क्लब ऑफ जालना व सीव्हील क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आणि जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या सहकार्याने येत्या २४ जून रोजी आझाद मैदानासमोरील सिव्हिल क्लबमध्ये सकाळी ८ ते सायंकाळी ६ या वेळेत ९ ते १८ वयोगटातील मुलींसाठी सर्वाइकल कॅन्सर प्रतिबंधक मोफत लसीकरण अभियान राबविण्यात येणार असून, यासाठी २३ जूनपर्यंत संमतीपत्र भरून द्यावे, असे आवाहन लॉयन्स क्लबच्या अध्यक्ष जयश्री लड्ढा यांनी केले आहे.

यासंदर्भात अधिक माहिती देताना सौ.लड्ढा यांनी सांगितले की, कॅन्सर पेशंट एड असोसिएशन मुंबई यांच्या सहभागातुन १५०० मुलींना मोफत लसीकरण केले जाणार आहे. यासंदर्भात विविध शाळांमध्ये विद्यार्थिनींना मार्गदर्शन करून जनजागृती करण्यात आली. लस देण्यासाठी केवळ पालकांचे संमतीपत्र आवश्यक असून, हे संमतीपत्र आणि मुलींचे आधार कार्ड २३ जून रोजी सादर करणे आवश्यक आहे. लॉयन्स क्लबतर्फे यापूर्वीही १८ फेब्रुवारी राबविण्यात आलेल्या लसीकरण मोहिमेत १०२४ विद्यार्थिनींना लस देण्यात आली होती. त्या उपक्रमाला समाजातून उदंड प्रतिसाद मिळाला. त्यामुळे पुन्हा हे शिबिर आयोजित करण्यात आले असून पंधराशे मुलींचे लसीकरण करण्याचा आमचा मानस आहे. सर्वाइकल कॅन्सर हा महिलांमध्ये गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर असून तो एच-पीव्ही या विषाणूमुळे होतो. भारतात दरवर्षी हजारो महिलांचा मृत्यू या कॅन्सरमुळे होतो. मात्र, ९ ते १८ वयोगटात दिलेले लसीकरण अत्यंत प्रभावी ठरते व या आजारापासून संरक्षण मिळू शकते. पालकांनी आपल्या मुलींचे लसीकरण करून घेण्यासाठी लवकरात लवकर संमतीपत्रे सादर करावीत, असे आवाहन क्लबच्या अध्यक्षा सौ. जयश्री लड्ढा, सचिव सौ. मंजू श्रीमाली, कोषाध्यक्ष सौ. कल्पना बियानी, सीव्हील क्लबचे अध्यक्ष ओमप्रकाश मंत्री, नरेंद्र अग्रवाल, मधुसूदन भक्कड, पंकज पाटणी, राजेन्द्र जेथलीया, सत्यनारायण दायमा, प्रदीप मुथ्था, अर्जुन गेही, अनिल गोयल आदींनी केले आहे.

## बस स्थानकावर टवाळखोरी करणारा कडून पोलिसांनी केली तलवार जप्त



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

मंठा येथील बस स्थानकावर दिनांक १९ गुरुवार रोजी दुपारच्या वेळी बसस्थानक परिसरात टवाळखोरी करणाऱ्या शेखर उर्फ महेश राम चोरमारे वय २० वर्ष रा. आंभोडा कदम , रवी सुरेश कांबळे वय १९ वर्ष रा. केंधळी या दोन तरुणांना पोलीस मदत केंद्रातील पोलीस कर्मचारी यांनी ताब्यात घेतले. पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर युवकांची चौकशी करण्यात आली.चौकशीत तलवार असल्याची माहिती प्राप्त झाली. सदर तलवार जप्त करण्यात आली असून आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल , अप्पर पोलीस अधीक्षक आयुष्य नेपाणी , पोलीस उपविभागीय अधिकारी चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे , फौजदार संतोष माळगे , पोलीस कर्मचारी हराळ , आसाराम मदने , विलास कातळकडे , श्रीमती डोईफोडे , संतोष बनकर , आनंद ढवळे यांनी केली. याप्रकरणी अधिक तपास पोलीस करत आहेत.

## योग व व्यायामामुळे आयुर्मान किमान पंधरा वर्षांनी वाढू शकते- डॉ.सचदेव

### लॉयन्स क्लबतर्फे कोठारी इंटरनॅशनल स्कूलमध्ये योग शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

नियमित योग व व्यायाम केल्यास मानवाचे आयुष्य किमान १५ वर्षांनी वाढू शकते. पूर्वी लोक व्यायामामुळे दीडशे वर्षे जगत असत, पण आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीतून व्यायाम दूर गेला आहे, त्यामुळे आजारांचे प्रमाण वाढले आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध वेलनेस तज्ञ व समग्र जीवनशैलीचे मार्गदर्शक डॉ. आर. डी. सचदेव यांनी केले.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्ताने कोठारी इंटरनॅशनल ड्रीम स्कूल आणि लायन्स क्लब, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने कोठारी स्कूलच्या मैदानावर



योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी डॉ. सचदेव बोलत होते. योगासने सादर करताना डॉ. सचदेव यांनी नियमित व्यायाम केल्यास रोगप्रतिकारक शक्ती वाढते, जीवनात सकारात्मकता येते आणि मानसिक आरोग्यही उत्तम राहते, असे सांगितले.

प्रारंभी कोठारी इंटरनॅशनल ड्रीम स्कूलच्या सचिव तृप्ती कोठारी व लायन्स क्लबच्या अध्यक्षा जयश्री लड्डा यांनी प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी अनिता देवीदान, रेणुका गोयल, जयप्रकाश श्रीमाळी, मर्लिन मानस, राम पाटील, महेश गुरमाळे, दिलीप ठाकूर यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. तृप्ती कोठारी यांनी देखील व्यायामाचे महत्त्व अधोरेखित करत सर्वांनी दररोज थोडा वेळ व्यायामासाठी द्यावा, असे आवाहन केले. या शिबिरात शाळेतील शिक्षक, विद्यार्थ्यांचे पालक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

# नियमीत योगा ही आरोग्यासाठी संजीवनी आहे : शहाजी उमाप

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२१ जून -**

नियमीत योगा ही आरोग्यासाठी संजीवनी आहे. सर्वांनी या योग दिनाच्या औचीत्याने नियमीत योगा करुन आपले आरोग्य सुदृढ करावे, असे आवाहन विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले. आज ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

आयुष मंत्रालय, भारत सरकार, महाराष्ट्र शासन, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे, जिल्हा प्रशासन, जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, योग विदया धाम, पतंजली योग समिती, जिल्हा योग संघटना, योग विद्येचा प्रसार करणाऱ्या स्थानिक संस्थांचे प्रतिनिधी व विविध खेळ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आज २१ जून रोजी सकाळी ७ वा. पोलीस परेड मैदान, वजिराबाद, नांदेड येथे या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, सहाय्यक जिल्हाधिकारी अनन्या रेडडी, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, अतिरिक्त पोलीस अधिक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक अश्विनी जगताप, शिक्षणाधिकारी माध्यमिक माधव सलगर, समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगीरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे आदींची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी उपस्थित नागरिकांना करो योग रहो निरोग असा



संदेश देवून ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

आयुष मंत्रालय, भारत सरकारच्या वतीने २१ जूनहा दिवस आंतरराष्ट्रीय योगा दिन म्हणून आयोजित करण्याचे निर्देश दिले असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांनी सन २०१४ च्या राष्ट्रीय महासभेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योगादिन म्हणून दरवर्षी साजरा करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने दरवर्षी २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योगा दिन म्हणून जगभरात मोठया उत्साहाने साजरा करण्यात येतो. योगा दिनाच्या निमीत्ताने जगभरात योगासनाची परंपरा स्वीकारणे व ती अंगीकारणे, ही आपल्या देशासाठी अभिमानाची बाब आहे. योगा हा आपल्या भारतीय संस्कृती वारसाचा अविभाज्य घटक आहे.

याप्रसंगी योग विदयाधाम व पतंजली योग समिती यांचेमार्फत उपस्थितांना आयुष मंत्रालय, भारतसरकार च्या प्रोटोकालनुसार पोलादवार (योगगुरु), शकुतंला कलंबरकर, अनिता नेरकर, राणी दळवी, सुजाता गोरेआदीनी योगासनाचे धडे दिले. याप्रसंगी संजय पवार, रवी पालमकर, रेणगुंटवार, श्रृती चिंतावार, मंगला जोंधळे, नारायण आष्टुकर आदी योगसाधकाच्या कृती मधील सुधारणा करण्याचे काम केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रलोभ कुलकर्णी यांनी तरआभार माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी मानले.

या योग दिन कार्यक्रमासाठी जिल्हयातील पिनॅकल इंग्लिश मेडीयम स्कुल, डीव्हीएम इंग्लिश मेडीयम स्कुल, व विविध शाळा, संस्थेतील विदयार्थी, जिल्हयातील एकविद्य क्रीडा संघटनेचे खेळाडू मुले-मुली व पदाधिकारी तसेच जिल्हयातील विविध शासकीय कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी, पोलीस अधिकारी, कर्मचारी, एसडीआरएफचे अधिकारी, कर्मचारी, जिल्हा योग संघटना व योग विद्येचा प्रसार करणा-या स्थानिक संस्थांचे प्रतिनिधी व योगप्रेमी आदीनी उत्सफुर्तपणे सहभाग नोंदवला.

हा कार्यक्रम यशस्वी करणेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांचे मार्गदर्शनाखाली कार्यासन प्रमुख राज्य क्रीडा मार्गदश्रक बालाजी शिरसीकर, क्रीडा अधिकारी संजय बेतीवार, राज्य क्रीडा मार्गदर्शक शिवकांता देशमुख, चंद्रप्रकाश होनवडजकर, क्रीडा अधिकारी राहुल श्रीरामवार, विपुल दापके, कनिष्ठ लिपीक दत्तकुमार धुतडे, संजय चव्हाण,आनंद जोंधळे, हनमंत नरवाडे, मोहन पवार, सुभाष धोंगडे, चंद्रकांत गव्हाणे, विद्यानंद भालेराव, यश कांबळे, सोनबा ओव्हाळ आदीनी सहकार्य केले.

## संक्षिप्त वृत्त

### सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**मुदखेड**-सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल मुदखेड येथे इयत्ता



दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष केशव कदम, तसेच संचालक नारायण गैणवाड, कोषाध्यक्ष माधव पचलिंग, उपाध्यक्ष गोविंद प्रसाद कालाणी व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक विजयकुमार बेंबडे व प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सुनिता भंगीरे, शिक्षक वर्ग जी. एम. पोगरे, माधव गाडेगावकर, बायस डी. टी. , नाहनाळे टी. जी., पवार टी. बी.,धनगरे डी. जी. यांच्या उपस्थितीत प्रथम क्रमांक आलेला शेख नोमान शेख अनवर ८९ टक्के, द्वितीय क्रमांक केशवार सानिका कैलास ८७.४० टक्के, तृतीय क्रमांक चौंदते अनुष्का बाळकृष्ण ८६.४० टक्के व चौंदते निकिता विनोद ८५ टक्के या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेच्या वतीने शाळेत करण्यात आला.

### श्री.भास्करराव पाटील पब्लिक स्कूल, शंकर नगर येथे जागतिक योग दिन उत्साहात

**नायगाव** -शंकर नगर येथील श्री भास्करराव पाटील पब्लिक स्कूल, या नामांकित इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळेमध्ये २१ जून रोजी जागतिक योग दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.
या विशेष कार्यक्रमात शाळेचे प्राचार्य दुर्गा प्रसाद पांडेय विद्यार्थ्यां समवेत योगाचे महत्व अधोरेखित केले. तसेच विद्यार्थ्यांना योग्य पद्धतीने योगास सने कशी करावीत, याचे सखोल मार्गदर्शन केले आणि योगशास्त्राचे महत्त्व स्पष्ट केले. योग दिनाच्या निमित्ताने सर्वांनी योगा फॉर वेलनेस या संकल्पनेचा स्वीकार करत दररोजच्या जीवनात योगाचा अंगीकार करण्याचा संकल्प या वेळी केला.

### आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साह साजरा

**हिमायतनगर-** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त एक देश एक योग ही संकल्पना देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागील ११ वर्षापासून सुरू



केली त्या मोहिमेला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळून दि २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन सर्वत्र साजरा केला जातो त्याचे औचित्य साधून हिमायतनगर जि.प. कन्याशाळा शहरातील पतंजली योग समिती व भारतीय जनता पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या प्रांगणात विविध वयोगटांतील नागरिकांनी एकत्र येऊन सामूहिक योग दिवस साजरा केला. यावेळी श्री परमेश्वर देवस्थान ट्रस्ट कमिटीचे उपाध्यक्ष महावीर श्रीश्रीमाळ यांनी योग ही केवळ शारीरिक व्यायाम पद्धती नाही, तर ती एक आध्यात्मिक साधना आहे, जी आपल्याला मानसिक शांती, आत्मविश्वास आणि संयम शिकवते असे मनोगत व्यक्त केले. समितीचे रामराव सूर्यवंशी यांनी बोलताना उपस्थितांना मार्गदर्शन केले त्यानंतर सामूहिक योग कार्यक्रमाद्वारे दररोज सर्वांनीच नियमित योगाभ्यास करण्याचा निर्धार केला, यावेळी समितीचे रामराव सूर्यवंशी, अक्कलवाड सर, मारोती लुम्दे, बाळू अण्णा चवरे,सुभाष बलपेलवार डॉ. उमरेकर, पळसीकर , वराडे सर, लक्ष्मण डांगे, विपुल दंडेवाड,विलास वानखेडे, नागेश शिंदे, गणेश पाळजकर या सह जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक कदम सर,चव्हाण सर, नाथा गांगुलवार सर, मुल्ला सर, सह आदी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अंत्यसंस्कार पुजारी पांडे बंधू यांना मातृशोक ; गं.भा. निशाताई पांडे यांचे निधन

**माहुर** -शहरातील प्रतिष्ठित पांडे कुटुंबातील अंत्येष्टी कर्म विधी गुरुजी,अंत्यसंस्कार पुजारी बंधु शशिकांत पांडे व शेखर पांडे यांच्या



मातोश्री गं.भा. निशाताई उर्फ मालुताई प्रभाकरराव पांडे(८२ वर्ष) यांचे २० जूनच्या मध्यरात्रीनंतर ७ व्या त्रियाम प्रहरी (२१ जून) १२:१३ वाजता वृद्धापकाळात अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.त्यांचे पार्थिवावर सकाळी ११:३० वाजता स्थानिक मातृतीर्थ तलाव परिसरातील हिंदुस्मशान भूमित मोठ्या आप्तपरीवारासह अनेक मान्यवरांच्या तथा शेंकडों नागरिकांच्या उपस्थितीत साश्रुनयनांनी अंत्यसंस्कार करण्यात आले. दिवंगत गं.भा. निशाताई पांडे ह्या माहूर नगरपंचायतचे कर्मचारी सुरेंद्र पांडे यांच्या मातोश्री तर पुसदचे शिवसेना (उबाठा) तालुका प्रमुख रवि राजेश्वरराव पांडे यांच्या वहिनी होत.त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडं असा मोठा परिवार आहे.

### टि. सी. व मार्क मेमो हरवले

उमरी ( प्रतिनिधी ) सदाशिव देवराव नरवाडे रा . बाभळी( ध) ता. धर्माबाद जिल्हा नांदेड या नावाची दहावी पासची मुळ टि .सी व मार्क मेमो इतर कागदपत्र बाभळी( ध) ते धर्माबाद बस प्रवास करताना हरवली आहे.

कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क करावे .

**संपर्क**

**सदाशिव देवराव नरवाडे रा . बाभळी (ध) ता . धर्माबाद**
**जि. नांदेड ९७६७९७४४७७, ९७६७७०३५६३**

# अखेर, येवलीच्या महिलांनीच पकडली अवैध दारू

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि.२१ जून -**

हदगाव तालुक्यातील येवली गावातील अवैध दारु विक्री बंद करण्यासाठी त्रस्त महिलांनी तामसा पोलीस ठाण्यासह जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रारी करुनही अवैध दारु विक्री बंद होत नसल्याने अखेर, महिलांनीच गावात विक्रीसाठी आलेली अवैध दारु पकडून दारू आणणाराला चोप देऊन पोलिसांना स्वाधीन केल्याची घटना दि. २१ रोजी शनिवारी भल्या पहाटे घडली.

तालुक्यातील येवली येथे मागील तीनचार वर्षापासून अवैध दारु विक्री मोठ्या प्रमाणात होत होती. गावातच दारु मिळत असल्याने दारूच्या नादी लागून अनेकांचे संसार उघड्यावर आले होते. दररोज बायका मुलांना मारहाण होऊन भांडणे तंटे होत होती. दारुड्याच्या नेहमीच्या त्रासाला कंटाळून महिला व ग्रामस्थांनी तामसा पोलीस ठाण्यात अनेकदा तक्रारी केल्या.



ग्रामसभेचा ठरावही दिल्याचे सांगितले. पोलीस ठाण्यावर महिलांनी मोर्चा देखील काढला होता. मात्र हप्तेखोरीच्या ओझ्याखाली दबलेल्या तामसा पोलीसांनी येवली येथील अवैध दारु विक्री बंद केली नाही. महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत पत्रव्यवहार केले होते. त्यानंतरही अवैध दारु विक्रीवर आळा बसला नसल्यामुळे अखेर, संतप्त महिलांनी अवैध दारु विक्रीविरुद्ध एल्गार पुकारला. दि. २१ रोजी गावातील महिलांनी एकत्र येऊन दारु विक्रीसाठी गावात येत असलेल्या मोटारसायकलला आडवले त्याचेकडे असलेले देशी दारूचे तीन बॉक्स पकडले. त्याला चांगलाच चोप देऊन पोलिसांच्या ताब्यात दिल्याने अवैध दारु विक्रेत्याचे धाबे दणाणले आहेत. यापुढे दारू विक्रीवर आळा घातला नाही, तर आमरण उपोषण करण्याचा इशारा ग्रामस्थ व महिलांनी दिला आहे. तामसा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांचे मार्गदर्शनाखाली बीट जमादार संदीप गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बशीर इस्माईल शहा (वय ३६) राहणार उमरी (जहागीर) यांचेविरुद्ध गुन्हा दाखल करुन भिंगरी संत्रा देशी दारूच्या १४४ बॉटल (तीन बॉक्स) किंमत १० हजार ८० रूपये, मोटासायकल क्रमांक एम. एच. २६, सीएफ ८९६२ अंदाजे किंमत ३० हजार रुपये असा एकूण ४० हजार ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

# प्राणिताताई देवरे यांच्या योग शिबिरास प्रचंड प्रतिसाद



**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.२१ जून -**

नियमित व्यायाम व संतुलित आहार असला पाहिजे. दररोज सकाळी योगा केल्याने शरीर सदृढ व उत्साही असते दिवसभर मनावरील ताणतणाव कमी होतो. प्रतेकानी दररोज व्यायाम करावा असे भाजपा महिला आघाडीच्या उपाध्यक्षा प्राणिताताई देवरे चिखलीकर यांनी केले योग शिबिराला मार्गदर्शन केले

कै. विश्वनाथराव नळगे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात प्राणिताताई देवरे चिखलीकर याच्या प्रमुख उपस्थितीत जागतिक योग दिन साजरा करण्यात आला.अकराव्या जागतिक योगदिनाच्या निमित्ताने आयोजित भव्य योग शिबिरास मार्गदर्शन करताना प्राणिताताई म्हणाल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी देश व जागतिक पातळीवर नेले आहे . याच फायदा आज होत आहे.रामदेव बाबांनी योग घराघरात पोहचविला आहे.राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आजच्या योग शिबीरात सहभाग घेतला आहे . जिल्ह्याचे तत्कालीन खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या योग शिबीर घेण्यात आले होते त्यांची नोंद गोल्डन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली.योग शिबिराच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष केरबा सावकार बिडवई,श्री स्वामी नरेंद्रचार्यजी महाराज नाणीजधाम यांचे शिष्य ,भाजपा महिला मोर्चा प्रदेश सचिव शोभाताई बगडे, माजी नगरसेविका कल्पनाताई मुकदम, माजी .संचालक कांता बिडवई, पं स .सदस्या सुरेखा वाले, अलका कनकदंडे, मुख्याध्यापक अनिल हामदे, प्राथमिक चे मुख्याध्यापक तांबोळे बि.डी. जाधव योगगुरु दिपक भातलवंडे , डॉ. सविता घंटे,संजीवनीताई गाढे,शिक्षण विस्तार अधिकारी एमबंलवाड मॅडम, सचिन मूकदम, गणराज केंद्रे पर्यवेक्षकएच.जाधव यांच्यासह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किनवट तालुक्यात विविध ठिकाणी योग शिबिरांचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२१ जून -**

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने किनवट शहरासह तालुक्यात विविध ठिकाणी योग शिबिरे आयोजित करण्यात आली.

भारतीय जनता पक्ष शहर मंडळातर्फे आयोजित मुख्य योग शिबिर कलावती गार्डन येथे आमदार भिमराव केराम यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. या कार्यक्रमाचे मार्गदर्शन श्री श्री रविशंकर संस्थेच्या योग शिक्षिका स्वाती नेम्मानिवारसिरमनवार यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन भाजपा शहर मंडल अध्यक्ष आयनेनीवार यांनी केले होते. तर संयोजक विश्वास कोल्हारीकर, बाळकृष्ण कदम व जयराज वर्मा यांनी हि सक्रिय सहभाग घेतला. तर शेवटी योगतज्ञ अखिल खान यांनी मनोगत व्यक्त केले.

शिबिरात माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, व्यंकटराव नेम्मानिवार, नारायण सिडाम, संतोष चनमनवार, माजी नगरसेवक शिवाजी आंधळे, पत्रकार मधुकर अन्नेलवार, प्रमोद पहुरकर, माजी शहराध्यक्ष सतीश बिराजदार, किरण किनवटकर, राजेंद्र भातनासे, कृष्णा पाटील, कृष्णा कालकुंतावर, पूनमताई दीक्षित, राणीताई तिरमनवार, नरसिंग तक्कलवार, चंद्रकांत नेम्मानिवार, संतोष कणाके, सतीश राऊत, सुभाष निलगीरवार, विश्वास सुंकरवार आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच, भाजपा उत्तर मंडळातर्फे मौजे पळशी येथील अशोक माध्यमिक विद्यालयातही योग शिबिर पार पडले. उत्तर मंडळ अध्यक्ष उमाकांत क-हाळे पाटील यांच्या अध्यक्षतेखालील या शिबिराचे संयोजन भाजपा ज्येष्ठ पदाधिकारी रमेश बद्दीवार यांनी केले. यावेळी उत्तर मंडळातील कार्यकर्ते, पदाधिकारी, नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, किनवट न्यायालय परिसरात न्यायालय व अभिवक्ता संघाच्या संयुक्त विद्यमाने योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात न्यायाधीश पी. एम. माने, न्या. के.जी.मेंढे, अभिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. किशोर मुनेश्वर, तसेच ज्येष्ठ व तरुण वकिलांची मोठी उपस्थिती होती. योग गुरु ॲड.पंडित गंगाराम घुले यांनी योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन दिले.

# कॉंग्रेसचे माजी नगरसेवक निर्मलेचा सपत्नीक भाजपा मध्ये जाहीर प्रवेश

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.२१ जून -**

कॉंग्रेसचे माजी नगरसेवक निर्मलेसह सुविद्यापत्नी सौ.शारदाताई बबनराव निर्मले यांनी नांदेड येथील शासकीय विश्रामगृह येथे माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण व पालकमंत्री अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत समर्थकांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

यावेळी भाजपाचे महानगराध्यक्ष माजी आ. अमर राजूरकर, भाजपाचे नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे,लोह्याचे माजी नगराध्यक्ष तथा भाजपाचे लोहा शहर मंडळ अध्यक्ष गजानन सुर्यवंशी, भाजपाचे लोहा तालुका उत्तर मंडळ व माजी उपनगराध्यक्ष शरद पाटील पवार यांची उपस्थिती होती. भारतीय जनता पार्टी मध्ये कॉंग्रेसचे माजी. नगरसेवक बबनराव निर्मले, त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. शारदाताई बबनराव निर्मले, सुपुत्र यशपाल बबनराव निर्मले यांनी भाजपमध्ये जाहीर केला.

आंबेडकर चळवळीचा सक्रीय कार्येकर्ता बबनराव निर्मले प्रतिक्रिया देताना म्हणाले देशाचे विकासमुख नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे ज्ञविकासमुख मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जिल्ह्याचे विकासमुख नेतृत्व माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भाजप पक्षात मोठ्या प्रमाणात इंनकमिग चालू आहे पण आम्ही विकासाच्या धोरणावर मी आंबेडकर चळवळीचा सक्रीय कार्यकर्ता असुन भाजपमध्ये प्रवेश करत आहे हे आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही करण समाजाचा विकास होणे हे मोठे फलित आहे.

# योग शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२१ जून -**

आंतरराष्ट्रीय योग दिवस किनवट दक्षिण मंडळात मराठवाडा विभाग संघटन मंत्री संजयभाऊ कौडगे, आमदार भीमराव केराम, जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांच्या नेतृत्वात इस्लापूर शहरातील साईमंदिर परिसरामध्ये योग शिबीर कार्यक्रमाचे तालुकाध्यक्ष सुर्यकांतआरंडकर यांनी आयोजन केले. या कार्यक्रमास योग शिक्षिका अनुराधा परमेश्वर पेशवे व बाबुराव केंद्रे यांनी योग अभ्यास दिला.

या वेळी ओबीसी नेते बाबुराव केंद्रे, गोविंद अंकुरवाड, कपिल करेवाड, संग्राम बिरकुले, रमेश बोड्डेवाड, विवेक केंद्रे, कपिल बंकलवाड, विकास माहुरकर, संतोष पेळे, सूर्यकांत बोधनकर, रवी कसब आदी उपस्थित होते.

# सहयोग नगर बुद्ध विहार परिसरात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२१ जून -**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सहयोग नगर येथील बुद्ध विहार परिसरात सुभेदार रामजी आंबेडकर सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी ट्रस्ट, महात्मा कबीर विद्यालय (प्राथमिक विभाग) आणि स्थानिक नागरिकांच्या सहभागातून योग सत्र आयोजित करण्यात आले.

योग ही केवळ व्यायामपद्धती नसून, ती एक जीवनशैली आहे. शरीर, मन आणि आत्मा यामध्ये संतुलन निर्माण करणारे हे शास्त्र आजच्या तणावपूर्ण जीवनात अत्यंत आवश्यक आहे. समाजात आरोग्याची जाणीव निर्माण करून



युवा पिढीला सकारात्मकतेकडे वळवण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत युवा नेतृत्व तथा सामाजिक कार्यकर्ते साहेबराव गायकवाड यांनी व्यक्त केले. तसेच शाळेतील एस.एस. जोशी, एन.बी. डुमणे आणि सर्व शिक्षिका यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून दिले.

या उपक्रमात अशोक जोंधळे, विजयकुमार उजेडकर, आनंद जोंधळे, जयराम सोनकांबळे, गौतम गवारे, राजेश बीऱ्हाडे, दिपक गायकवाड, विशाल भद्रे, सोपान काळबांडे आदीसह शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी साहेबराव गायकवाड, ट्रस्टचे प्रमुख यांनी विशेष पुढाकार घेतला.

# साधू महाराज संस्थान दिंडीला संरक्षण आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देणार : आ. चिखलीकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२१ जून -**

कंधार येथील साधु महाराज संस्थानच्या दिंडीची अनेक वर्षांची परंपरा आहे, मराठवाड्यातील महत्वाची असलेल्या साधु महाराज दिंडीच्या कंधार ते पंढरपुर प्रवासात अनेक अडचणी निर्माण होतात यासाठी दिंडीला पोलीस संरक्षण व आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी आपण सरकारकडे पाठपुरावा करणार असुन पुढील वर्षापर्यंत या सुविधा उपलब्ध करुन देऊ असे प्रतिपादन आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले ते माळेगाव येथे साधु महाराज दिंडीच्या स्वागत कार्यक्रम प्रसंगी बोलत होते.



या प्रसंगी ह.भ.प. एकनाथ महाराज, ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज, जना माय, किर्ती माय, भास्कर महाराज, चालीकवार गुरूजी, बनवसकर महाराज, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, युवा नेते राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस प्रविण पाटील चिखलीकर, सौ.प्रणिताताई देवरे चिखलीकर, किरण सावकार वटमवार, केशवराव मुकदम, दत्ता वाले, मनोहर पाटील भोसीकर, स्वप्नील पाटील लुंगारे, माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशराव पाटील सावळे, लोहा पंचायत समितीचे माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे, किशनराव डफडे, नरेंद्र गायकवाड, रोहित पाटील, चंद्रमुनी मस्के, परमेश्वर मुरकुटे, हरीभाऊ चव्हाण, वीरभद्र राजुरे, गणपत तिडके, बाळू बाबर, माऊली बाबर, बालाजी पाटील कदम, भगवान राठोड, राजकुमार कोकाटे, प्रभाकर सुरनर, बंडू पाटील वडजे, भानुदास पाटील मस्कीकर, पिराजी पोले, भिमराव नाईक, मारोती पाटील बोरगांवकर, बाळासाहेब गरजे, कांता पाटील बोडके, अंबादास जहागीरदार, सकाराम तिडके, सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश मुळीक,चेतन केंद्रे, बाबुराव कांबळे माळेगांव येथील सर्व ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, से.स.सो.चेअरमन राधाकिशन फुगनर आदी उपस्थित होते. आभार हणमंत धुळगंडे यांनी मानले.

माळेगाव येथे मागील अनेक वर्षांपासून आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर कुटुंबीयांकडून दिंडीचे स्वागत केले जाते, आमदार चिखलीकर यांचे वडील शांतीदुत गोविंदराव पाटील चिखलीकर यांच्यापासून जिल्हा सीमेवर साधु महाराज दिंडीच्या स्वागताची व अन्नदानाची परंपरा आहे, ती चिखलीकर कुटुंबीयांकडून आजही सुरु आहे, शिवाय दिंडीच्या अडीअडचणींना आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर नेहमी धाऊन जातात, कंधार ते पंढरपुर प्रवासात दिंडीला येणाऱ्या अडचणीत आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर मदतीला कायम असतात अशी माहिती भास्कर साधु महाराज यांनी यावेळी बोलताना दिली.

यावेळी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर कुटुंबीयांकडून दिंडीतील भाविकांचा यथोचित सत्कार करण्यात आला, अन्नदान करण्यात आले, स्वतः आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिंडीतील भाविकांसह पावले खेळत, भजन करत जिल्हा सीमेपर्यंत दिंडीला निरोप देण्यात आला.

**जातीयवाद संपला पाहिजे !**

मी अठरा निवडणुका लढविल्या मात्र कधीही जातीयवाद झाला नाही या विधानसभा निवडणुकीत जातीयवाद मोठ्या प्रमाणात झाला, माझी पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना आहे हा जातीयवाद संपला पाहिजे, माणुसकी हीच नविन जात व्हावी यात एकमेकांना मदत व्हावी ही अपेक्षा यावेळी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केली.







श्री संत मुक्ताबाई पालखीचे पहिले गोलरिंगण गढी येथील जय भवानी सहकारी साखर कारखाना येथे झाले. आज बीडमध्ये मुक्ताबाईची पालखी दाखल होणार आहे. (छाया : कृष्णा शिंदे)

## प्रवीण ठोंबरे व तातेबा काळे यांना राष्ट्रीय आदर्श क्रिडा शिक्षक पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२१ जून**



केज तालुक्यातील उंदरी गावचे रहिवासी प्रवीण ठोंबरे व तातेबा काळे यांना क्रीडा संस्कृती फाउंडेशन, नाशिक च्या वतीने सन २०२५ च्या राष्ट्रीय आदर्श क्रिडा शिक्षक पुरस्कारासाठी बीड जिल्ह्यातील कै.वसंतराव नाईक प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा, अंबाजोगाई येथील क्रीडा शिक्षक श्री प्रवीण ठोंबरे सर व दत्त माध्यमिक विद्यालय सोमनाथ बोरगाव क्रीडा शिक्षक तातेबा काळे यांची निवड झाली आहे.यांनी क्रिडा क्षेत्रात विद्यार्थ्यांना घडवत तालुका, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर दिलेल्या योगदानाबद्दल त्यांची निवड झाली आहे.

यांना दि.२२ जून २०२५ रोजी नाशिक येथे मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. यांच्या या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# कुख्यात दरोडेखोरास दुचाकी चोरीच्या गुन्हयात पकडले

### पाच दुचाकी हस्तगत स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ जून**



दिनांक २०.०६.२०२५ रोजी महादेव भगवान दळवे, वय ५४ वर्ष, रा बालेपीर बीड यांनी पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे फिर्याद दिली की, त्याचे राहते घरासमोरुन दुचाकी कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी हॅन्डल लॉक तोडुन चोरुन नेली आहे वगैरे फिर्यादीवरुन पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदरील दाखल गुन्हयाचे अनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक बीड यांनी सदरील मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे सुचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या. त्या नुसार स्थानिक गुन्हे शाखेने गुन्हा उघडकीस आणण्याचे प्रयत्न सुरु केले असता दिनांक २०.०६.२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, सदरचा गुन्हा हा अतुल विक्रम वाघमारे याने केला. आरोपी अतुल विक्रम वाघमारे हा संभाजीनगर, बीड येथील किरायच्या राहत्या घराचे जवळ थांबला आहे अशी माहीती वरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने छापा मारुन पकडले. त्याचे ताब्यातुन वेगवेगळया कंपणीच्या पाच दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. सदर मोटार सायकल बाबत विचारणा केली असता सदरील मोटार सायकली हया बीड परीसरात वेगवेगळ्या ठिकाणाहुन चोरल्या आहेत. असे आरोपीने सांगीतले त्यापैकी होंडी कंपणीचे शाईन दुचाकी जिचा चेसीस क्रमांक चए४गउ८५६त्रृचऊ२०८८०२ आम्ही खात्री केली असता सदरील मोटार सायकल हि पोलीस ठाणे शिवाजीनगर गु.र.नं ३४१/२०२५ कलम ३०३(२) बी.एन.एस मधील असल्याची खात्री झाली. आरोपीने एकुण पाच मोटार सायकली चोरल्याचे कबुल केले. आरोपी व पाच दुचाकी पुढील तपासकामी पोलीस ठाणे शिवाजीनगर यांचे ताब्यात दिले आहेत. आरोपी अतुल विक्रम वाघमारे याचेवर दरोडेसारखे बरेच गुन्हे दाखल असल्याचे पोलीस अभिलेखावरुन दिसुन येत आहे.

सदरील कारवाई श्री नवनित कॉंवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्री सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक, बीड, श्री शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारोती कांबळे, विकास राठोड, भागवत शेलार, दिपक खांडेकर, आशपाक शेख, चालक संजय जायभाये यांनी केली आहे.

# श्री चिंतेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२१ जून**



भारतीय शिक्षण प्रसारक संस्था,अंबाजोगाई संचालित श्री चिंतेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालय,गेवराई येथे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग संगम या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय शिक्षण समिती अध्यक्ष मा.श्री अक्षयजी कुलकर्णी प्रमुख उपस्थिती म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह मा.डॉ. हेमंतजी वैद्य, भाजपा तालुका अध्यक्ष श्री सचिनजी दाभाडे, ड.ज्ञानेश्वरजी खाडे, श्री.नितीनजी डोळे, श्रीमती प्रणिता ताई हिटनाळीकर तसेच योग प्रशिक्षक श्रीमती विभावरी ताई कुलकर्णी आणि प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री.प्रदीपजी जोशी हे व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. आंतरराष्ट्रीय योग दिनाचे महत्त्व सांगणारे प्रास्ताविक श्री प्रदीपजी जोशी यांनी केले.त्यानंतर श्रीमती विभावरी ताई कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थित मान्यवर आणि विद्यार्थ्यांनी विविध योगासने आणि प्राणायामाचे सादरीकरण केले.

अध्यक्षीय भाषणात श्री अक्षयजी कुलकर्णी यांनी, निरोगी शरीरातच निरोगी मन वास करते. त्यामुळे प्रत्येकाने दररोजच्या दिनचर्येत योग आणि प्राणायामाचा अविभाज्य भाग करावा,असे प्रतिपादन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीम.राधा माने,पद्य गायन श्रीम.विद्या घिगे,तर आभार प्रदर्शन श्री उदय देशमुख यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप कल्याण मंत्राने करण्यात आला.

# श्री बालाजी शिक्षण मंडळाच्या वतीने गुणवंतांचा सन्मान व कौतुक सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२१ जून**



अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने मोदी लर्निंग सेंटरमध्ये आज नीट, सीईटी,तसेच दहावी व बारावी मध्ये घवघवीत यश मिळवलेल्या अंबाजोगाई शहर व परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान व कौतुक सोहळा नुकताच संपन्न झाला. यावेळी संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांनी अंबाजोगाई शहरातील शिक्षण हे अत्यंत गुणवत्ता पूर्ण असल्याने येथून विद्यार्थ्यांची एक आदर्श अशी पिढी निर्माण होत असल्याची भावना व्यक्त केली. प्राचार्य बी आय खडकभावी, संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत मोदी, प्राचार्य एम प्रशांतकुमार,ॲड संतोष पवार, प्रा सविता बुरांडे तसेच डिंपल मोदी यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये गुणवंतांचा हा सन्मान व कौतुक सोहळा संपन्न झाला.

या सोहळ्याची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे प्राचार्य एम प्रशांतकुमार यांनी केले. यावेळी त्यांनी सांगितले की श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ हे येथील विद्यार्थ्यांना नेहमीच उच्च तथा गुणवत्ता पूर्वक शिक्षण देत आले आहे. त्यामुळे येथील विद्यार्थी हा परिपूर्ण होऊनच समाजात बाहेर पडतो असे सांगितले. यावेळी प्राचार्य बी आय खडकभावी तसेच ॲड संतोष पवार यांनी देखील उपस्थिती गुणवंत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# श्रीसंत गजानन महाराजांच्या पालखीचे अंबाजोगाईत भक्तीमय वातावरणात स्वागत

### संताच्या जयघोषाने शहर दुमदुमले

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२१ जून**

श्री संत गजानन महाराज यांच्या पालखीचे शनिवारी दुपारी अध्यात्मिक परंपरा लाभलेल्या अंबाजोगाई शहरात आगमन झाले. शहरातील महिला,पुरुष भाविक भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

टाळ मृदंगाच्या तालावर शेकडो वारकऱ्यांनी ज्ञानेश्वर माऊली ज्ञानराज माऊली तुकाराम च्या गजरात ठेका धरला. पंढरीनाथ महाराज की जय, विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल,संत गजानन महाराज की जय, गण गण गणात बोते या जयघोषात एका पाठोपाठ सुंदर चालीवर भजने म्हटली जातात प्रस्थानाच्या मार्गावर शहरांमध्ये विविध ठिकाणी श्रीसंत गजानन महाराज पालखीचे उत्स्फूर्तपणे स्वागत आणि पूजा करण्यात आली पंढरपूरकडे मार्गक्रमण करणाऱ्या शेगाव येथील श्रीसंत गजानन महाराजांच्या पालखी सोहळ्याला मोठी अध्यात्मिक परंपरा असून या पालखी सोहळ्यात शेगाव येथून अश्व आणि मोठ्या संख्येने वारकरी सहभागी असून यात काही टाळकरी तर काहींच्या हाती भगव्या पताका आहेत.



श्रीसंत गजानन महाराज पालखी सोहळा हा अत्यंत शिस्तबद्ध व विशिष्ट पद्धतीने अध्यात्मिक परंपरा जतन करणारा म्हणून ओळखला जातो.श्री संत गजानन महाराज पालखीचा मुक्काम अंबाजोगाई शहरातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात असून रात्री भजन किर्तन, महाप्रसाद कार्यक्रम होणार आहे. रविवारी सकाळी श्रीसंत गजानन महाराज यांच्या पालखीचे पंढरपूरसाठी अंबाजोगाई शहरातून प्रस्थान होईल.

महसुल दिंडी

यावर्षी प्रथमच जिल्हाधिकारी यांच्या सुचनेनुसार गजानन महाराज यांच्या दिंडी समवेत महसुली दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. शासनाच्या वतीने सर्वसामान्य माणसांसाठी आयोजित करण्यात आलेल्या विविध सोयी सवलती व सुविधांची माहिती नागरीकांचा व्हावी यासाठी या महसुल दिंडीचे आयोजन करण्यात आले असल्याचे तहसीलदार विलास तरंगे यांनी सांगितले.

## योग दिन दीनदयाल शोध संस्थान नानाजी देशमुख विद्या मंदिर गोकुळ शिशु वाटिका बीड येथे नाविन्यपूर्ण साजरा



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२१ जून**

दीनदयाल शोध संस्थान संचलित, नानाजी देशमुख विद्या मंदिर गोकुळ शिशु वाटिका बीड मध्ये योग दिन साजरा करण्यात आला. त्यामध्ये स्वच्छंद गट, प्रल्हाद गट , ध्रुव गट , पहिली व दुसरी इत्यादी मुलांचा समावेश होता. मुलांनी ओंकार, भ्रामरी, अनुलोम विलोम, सूर्यनमस्कार, ताडासन इत्यादी आसन खूप सुंदर रित्या पाहून केली. मधुराताई गुळवेलकर व क्रांती ताई जैन यांनी योगासने घेतली. मधुराताईंनी योगासना बद्दल माहिती व योगा करण्याचे फायदे सांगितले.सर्व मुलांनी चांगल्या प्रकारे योगासने केली. त्यातून त्यांना खूप आनंद मिळाला. अशा प्रकारे योगा दिन साजरा करण्यात आला.